cmyk

## संपादकीय

### काहीही करा पण मतदारराजा ठरवील तीच पूर्वदिशा...

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारांनी ज्या प्रकारे कौल देऊन आपली मनस्थिती स्पष्ट केली आहे त्याचा विचार करता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबतही मतदारांची मनस्थिती कशी असणार आहे हे सर्वात जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. गेली पाच वर्षे महाराष्ट्रातील राजकारणावर बारीक लक्ष ठेवून असणारा हा मतदार यावेळी कोणता कौल देतो याची उत्सुकता यावेळी सर्वात जास्त असणार आहे. केवळ महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या लोकशाही निवडणुकीच्या इतिहासामध्ये सर्वात चुरशीची निवडणूक म्हणून या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीकडे पाहावे लागणार आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com



### विमानात बॉम्ब असल्याची अफवा पसरवणाऱ्यांवर आता कडक कारवाई

नवी दिल्ली: मागील काही दिवसांपासून विमानांमध्ये बॉम्ब असल्याच्या अफवांमुळे अनेक विमानसेवा प्रभावित झाल्या आहेत. त्यामुळे विमानसेवेला मोठा फटका बसला आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने याची गंभीर दखल घेतली आहे. अशा अफवा रोखण्यासाठी विमान वाहतूक मंत्रालयाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी संबंधित मंत्रालयांसोबत विद्यमान कायद्यांमध्ये आवश्यक दुरुस्त्या करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जेणेकरून बनावट बॉम्बच्या धमक्यांना कठोरपणे सामोरे जाऊ शकते. दरम्यान, देशातील सर्व प्रमुख विमान कंपन्यांना गेल्या चार दिवसांत किमान २६ बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१७७ | शनिवार, दि.१९ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# सरकारच्या धोरणांचा शेतकऱ्यांवर नकारात्मक परिणाम

## ओईसीडीचा जागतिक अहवाल प्रसिद्ध, जगाच्या तुलणेत भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न सरकारमुळे कमी



पुणे । प्रतिनिधी

अमेरिका, ब्राझील, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, रशिया, इस्त्राईल, इंडोनेशिया तसेच इतर देशांमध्ये त्यांच्या सरकारांच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होते. पण भारतातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सरकारी धोरणांमुळे वाढ होण्याऐवजी घट होते कारण सरकारचा आधार उणे आहे. म्हणजेच सरकारच्या एकूण धोरणांचा नकारात्मक परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो, असे ऑर्गेनायझेशन फॉर को–ऑपरेशन अॅन्ड डेव्हलपमेंट अर्थात ओईसीडी या संस्थेने आपल्या अहवालात म्हटले आहे.

ऑर्गेनायझेशन फॉर को–ऑपरेशन अॅन्ड डेव्हलपमेंट ही संस्था आर्थिक विकास आणि जागतिक व्यापार वृध्दीसाठी काम करते. ओईसीडी या संस्थेने सर्व देशांच्या शेतीविषयक धोरणांची माहिती दिली. विविध देशांची सरकारे अनुदान, निविष्ठा अनुदान, करात सवलत, निर्यात सवलत, आयात प्रतिबंध, किंमत नियंत्रण अशी धोरणे ◀◀ पान २ वर

### भारतीय शेतकऱ्यांचे सर्वाधीक वाईट हाल

ओईसीडीच्या अभ्यासातून असे स्पष्ट झाले की जगात केवळ भारत, अर्जेंटीना आणि व्हिएतनाम या तीन देशातील सरकारांनी आपल्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले. त्यातही भारतातील शेतकऱ्यांचे हाल सर्वात वाईट आहेत, हेही स्पष्ट होते. कारण सरकारच्या धोरणांमुळे भारतातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याऐवजी तब्बल १६ टक्क्यांनी कमी होते. म्हणजेच भारतात सरकारी धोरणांचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर नकारात्मक परिणाम होतो. भारतासोबतच अर्जेंटीनात १५ टक्के आणि व्हिएतनाममध्ये १० टक्के उत्पन्नावर परिणाम होतो.

### चार देशांत सरकारी धोरणामुळे उत्पन्नात ४० टक्के वाढ

चार देश असे आहेत की तेथील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सरकारी धोरणांमुळे तब्बल ४० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ होते. हे देश म्हणजे नॉर्वे, आयरलँड, स्वित्झर्लंड आणि कोरिया. जापानमधील शेतकऱ्यांनाही तब्बल ३८ टक्के उत्पन्न सरकारात्मक सरकारी धोरणातून मिळते. तसेच शेतकऱ्यांना मिळालेल्या एकूण शेती उत्पन्नात ब्राझीलमध्ये सरकारी धोरणांचा वाटा ३.५० टक्के, ऑस्ट्रेलियात ४.३३ टक्के, अमेरिकेत ७.२१ टक्के आणि कॅनडात ७.६२ टक्के वाटा सरकारी धोरणांचा आहे, असेही या अहवालात म्हटले आहे.

### महाराष्ट्रातील रस्ते प्रकल्पांमध्ये १० हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार; कॉंग्रेसचा आरोप

दिल्ली । वृतसंस्था

महाराष्ट्रातील विविध रस्ते प्रकल्पांच्या निविदा वाटप करताना महायुती सरकारने दहा हजार कोटी रुपयांचा मोठा गैरव्यवहार केल्याचा आरोप कॉंग्रेसने केला. महायुती सरकारने महाराष्ट्राच्या करदात्यांची तब्बल दहा हजार कोटी रुपयांची लूट केली आहे. त्यासाठी पात्रतेच्या निकषांमध्ये अशा प्रकारे बदल करण्यात आला की केवळ दोन विशिष्ट कंपन्यांना निविदा काढता आल्या, असाही दावा कॉंग्रेस पक्षाने केला. तसेच निवडणुकीनंतर महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर या सर्व प्रकल्पांची चौकशी केली जाईल आणि कोणालाही सोडले जाणार नाही, असा इशाराही कॉंग्रेसने दिला.



दिल्लीस्थित कॉंग्रेस मुख्यालयात प्रवक्ते पवन खेडा यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी पवन खेडा म्हणाले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार एका कंपनीला केवळ दोनच प्रकल्प मिळू शकतात. मात्र महाराष्ट्रात या प्रकरणात दोन कंपन्यांना प्रत्येकी चार प्रकल्प देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने केलेल्या ◀◀ पान २ वर

# मविआच्या मतदारांची नावे यादीतून वगळण्याचे भाजपा–शिंदे सेनेचे षडयंत्र!

## नाना पटोले यांचा आरोप, महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट

मुंबई । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूक निष्पक्ष व पारदर्शक झाली पाहिजे, मतदान वाढले पाहिजे असे निवडणूक आयोग सांगत असते पण निवडणूक आयोगाच्या कामातच पारदर्शकता व निष्पक्षपातीपणा दिसत आहे. सत्ताधारी पक्षाच्या इशाऱ्यावर अधिकारी काम करत आहेत. ऑनलाईन फॉर्म ७ च्या माध्यमातून मविआच्या मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात मतदार यादीतून वगळली जात आहेत, यामागे एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस आहेत असा गंभीर आरोप करून रडीचा डाव खेळू नका, हिम्मत असेल तर आमने सामने लढा, असे आव्हान कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा–शिंदे सेनेला दिले.**



शिवालय येथे पत्रकार परिषदेत बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष व त्यांचे सहकारी पक्ष पराभवाच्या भितीने षडयंत्र करत आहेत. निवडणूक आयोग मोदी–शाह यांच्या इशाऱ्यावर काम करत आहे. हे लोकशाहीला काळीमा फासणारे आहे, आयोगाच्या कामात सरकारचा हस्तक्षेप होता कामा नये. सरकारी योजनांची माहिती देण्याच्या नावाखाली राज्यात ५० हजार योजना दूतांना ◀◀ पान २ वर

### राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना निवेदन

या पत्रकार परिषदेनंतर महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले. या शिष्टमंडळात कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, प्रदेश कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष व कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नसीम खान, विधान परिषदेतील कॉंग्रेस पक्षाचे गट नेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, शिवसेना खा. अनिल देसाई, प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांचा समावेश होता.

## आरक्षण मिळाल्याने नोकरी लागत नाही;त्याला बुद्धिमत्ता असावी लागते

### भीमराव धोंडे यांचा अप्रत्यक्षरीत्या मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला टोला

आष्टी । प्रतिनिधी

सध्याचे राजकारण हे जाती तिकडे झुकले असून प्रत्येक समाजात संघटित होऊ लागला आहे आपल्याला देखील संघटित होण्याची गरज आहे मी देखील तुमचाच भाग असून येणाऱ्या काळात भटक्या निमित्त जाती जमातीच्या सर्व समाज बांधवांनी माझ्या पाठीशी उभा राहावे असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आज भटक्या मुक्त जाती जमातीच्या संवाद मेळाव्या



प्रसंगी केले यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष साहेबराव मस्के, भाजपा युवा मोर्चा सरचिटणीस अजय धोंडे भाजपा भटके मुक्त राज्य उपाध्यक्ष भाग्यश्री ◀◀ पान २ वर

## आघाडी आणि युती दोघांचाही एन्काऊंटर करणार

नागपूर । प्रतिनिधी



**जनता महायुती आणि महाविकास आघाडी दोघांनाही कंटाळली आहे. भाजप कॉंग्रेस एकच आहेत, अर्थकारणात काही बदल झालेला नाही. आम्ही मुद्यावर लोकांना घेऊन जाऊ. आघाडी आणि युती दोघांचाही एन्काऊंटर करणार. ४ नोव्हेंबरला महाशक्ती राजकीय स्फोट करणार, असा इशारा प्रहारचे नेते आ. बच्चू कडू यांनी दिला.**

नागपुरात शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना आ. कडू म्हणाले, ४ नोव्हेंबरला स्पष्ट होईल. चांगले उमेदवार आणि चांगले मतदारसंघ आमच्याकडे आलेले दिसतील. अर्ज मागे घेतल्यानंतरच पिक्चर क्लिअर होईल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री ◀◀ पान २ वर

## जो पर्यंत सर्वसामान्य माणूस माझ्या सोबत तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही–सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

माझ्याकडे या मतदार संघाचा डेवोलपमेंट प्लॅन आहे सुजलाम सुफलाम हा मतदार संघ करण्याचा माझा पहिल्या पासून माणसं आहे. तुम्ही संधी दिल्यास हे सर्व मी करून दाखविणार आहे.कुणी कितीही वल्गना करुद्या कितीही समोर येऊद्या जो पर्यंत गोरगरीब,सर्वसामान्य जनता माझ्या सोबत आहे मी तोपर्यंत मी कुणालाच घाबरत नाही



म्हणत आ.सुरेश धस यांनी आगामी विधानसभा निवडणूक लढविण्याबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत.गुरुवारी शहरातील मोरेश्वर लॉन येथे आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील व्यापारी बांधवांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष संजय मेहेर शिरूर नगराध्यक्ष रोहिदास पाटील,मधुसूदन खेडकर, डॉ.बडजाते,अभिजीत डूगरवाल, ◀◀ पान २ वर

## रश्मी बर्वेंना सर्वोच्च न्यायालयाचीही क्लीन चिट

### राज्य सरकारची याचिका गुणवत्ताहीन ठरवून फेटाळली

नागपूर । प्रतिनिधी

कॉंग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांना जात वैधतेच्या प्रकरणामध्ये क्लीन चिट देणारा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी कायम ठेवला व या निर्णयाविरुद्ध राज्य सरकारने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका गुणवत्ताहीन ठरवून फेटाळून लावली. बर्वे यांच्याविरुद्ध राजकीय दबावाखाली कारवाई ◀◀ पान २ वर



## जातीपाती वर येऊन ठेपलेल्या राजकारणामुळे नेत्यांचा कस लागणार

### राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी मोर्चे बांधणी सुरू

आष्टी । प्रतिनिधी

राज्यात मागील वर्षभरापासून राजकीय आणि सामाजिक वातावरण पूर्णतः बदलेलं आहे. यामध्ये राज्यातील जातीय सलोखा नष्ट होण्याच्या मार्गावर आला आहे. बदलेल्या परिस्थितीमुळे महाराष्ट्र राज्य पूर्णपणे ढवळून निघाले असून स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे देखील बदलले आहेत. पूर्णतः जातीपाती वर येऊन ठेपलेल्या राजकारणामुळे येणाऱ्या निवडणुकीत जातीय समीकरणं जुळवण्यात नेत्यांचा कस लागणार असल्याचे बोलले जात आहे. विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मतदारसंघातील आजी माजी लोकप्रतिनिधींनी आपले राजकीय अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी विविध मेळाव्यांच्या माध्यमातून निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू केली असल्याचे दिसून येते. ◀◀ पान २ वर

**आष्टी पाटोदा शिरूर मतदान आकडेवारी**

एकूण मतदान – ३,८३,०३०
पुरुष मतदान – २,०३,८३८
महिला मतदान – १७९,१९२

आष्टी तालुका – २,१०,४९९
पाटोदा तालुका – १,०४,८५२
शिरूर तालुका – ६७६७९

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१७ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | २,४२१ | २,५४० | २,४८७ |
| ज्वारी/हायब्रिड :४२.५० क्विंटल | १,६२५ | २,७११ | २,१८१ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद :२०.०० क्विंटल | ५,२०० | ७,६०० | ६,७३४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,५०० | २,५०१ | २,५०० |
| मुग : १०.५० क्विंटल | ६,६९० | ७,१०० | ६,९६४ |
| सोयाबीन: ७५३.०० क्विंटल | ३,००० | ४,४०० | ४,०२९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |

# बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक जनजागृती गरजेची : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृतसंस्था

**बालविवाह रोखण्यासाठी केवळ शिक्षा करून चालणार नाही, तर त्यासाठी सामाजिक जनजागृती गरजेची आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नोंदवले. यासोबतच बालविवाह प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीमध्ये त्रुटी असल्याचे निरीक्षणही सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. बाल विवाहांमुळे व्यक्तीचा जोडीदार निवडण्याचा पर्याय हिरावून घेतला जातो, असे न्यायालयाने म्हटले आहे.**

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठांसमोर बालविवाह प्रकरणी सुनावणी झाली. खंडपीठाने नमूद केले की, २००६ च्या बालविवाह प्रतिबंध कायदाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी बहु–क्षेत्रीय समन्वय आणि मजबूत प्रशिक्षणाची गरज आहे. प्रतिबंधात्मक रणनीती वेगवेगळ्या समुदायांनुसार बनवायला हवी. बहु–क्षेत्रीय समन्वय असेल तेव्हाच कायदा यशस्वी होईल.



कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि क्षमता वाढवणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने म्हटले. बालविवाह प्रतिबंध कायद्याच्या तरतुदींमध्ये अनेक तफावत आहेत आणि विशेषत: हा कायदा बालविवाहांच्या वैधतेबाबत मौन बाळगून आहे. हे खंडपीठाने अधोरेखित केले. त्यामुळे असे विवाह ◀◀ पान २ वर

### याचिकेतून कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप

सोसायटी फॉर एनलाइटनमेंट अँड व्हॉलंटरी अॅक्शन या एनजीओने ही जनहित याचिका दाखल केली होती. याचिकेत बाल विवाह प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जात नाही, असा युक्तिवाद करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल २०१८ मध्ये या प्रकरणी केंद्र सरकारचा उत्तर मागितले होते आणि यावर्षी १० जुलै रोजी निकाल राखून ठेवला होता.

cmyk

अग्रलेख

# काहीही करा पण मतदारराजा ठरवील तीच पूर्वदिशा...

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारांनी ज्या प्रकारे कौल देऊन आपली मनस्थिती स्पष्ट केली आहे त्याचा विचार करता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबतही मतदारांची मनस्थिती कशी असणार आहे हे सर्वात जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. गेली पाच वर्षे महाराष्ट्रातील राजकारणावर बारीक लक्ष ठेवून असणारा हा मतदार यावेळी कोणता कौल देतो याची उत्सुकता यावेळी सर्वात जास्त असणार आहे. केवळ महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या लोकशाही निवडणुकीच्या इतिहासामध्ये सर्वात चुरशीची निवडणूक म्हणून या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीकडे पाहावे लागणार आहे.

पाच वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ मध्ये जेव्हा विधानसभेची निवडणूक झाली होती तेव्हा ती लढत सरळ सरळ एका बाजूला भाजपा-शिवसेना युती आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी यांच्यामध्ये होती. पण गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये घडलेल्या विविध फाटाफुटीच्या घटनांमुळे आता सत्ताधारी बाकावरील तीन पक्ष आणि विरोधी बाकावरील तीन पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. या व्यतिरिक्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित आघाडी, नव्याने निर्माण झालेली तिसरी आघाडी या सर्व राजकीय पक्षांच्या जोडीने काही सामाजिक संघटनासुद्धा या निवडणुकीमध्ये उतरल्या आहेत. विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यावर ज्या प्रकारे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे यांनी या निवडणुकीमध्ये आता आम्हीही उतरणार आहोत, अशी घोषणा केली आहे ती निश्चितच महत्त्वाची आहे. दुसरीकडे, ओबीसी गटाचे नेतृत्व करणारे लक्ष्मण हाके यांनीसुद्धा या निवडणुकीमध्ये आमची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची घोषणा केली आहे. आतापर्यंत जरी राजकीय पक्ष पातळीवर निवडणुका लढवल्या जात असल्या तरी यावेळी प्रथमच या निवडणुकींना सामाजिक संदर्भ आहेत. अर्थात, जरांगे यांनी थेटपणे सरकारच्या विरोधात भूमिका घेतली असल्यामुळे आपोआपच त्यांचा पाठिंबा महाविकास आघाडीला अप्रत्यक्षपणे का होईना असणार आहे. दुसरीकडे, ओबीसी आघाडीचे नेतृत्व करणारे लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांना विरोध करण्याच्या निमित्ताने सत्ताधारी आघाडीलाच अप्रत्यक्षपणे पाठिंबा देण्याचे काम केले आहे. म्हणून जरांगे यांना मानणारा मराठा मतदार असो किंवा गेल्या काही कालावधीमध्ये ध्रुवीकरण झाल्यामुळे नव्याने जागरूक झालेला ओबीसी मतदार असो त्यांची भूमिका या निवडणुकीमध्ये निश्चितच महत्त्वाची ठरणार आहे. या सर्व सामाजिक घडामोडींची जाणीव असल्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने गेल्या काही कालावधीमध्ये घेतलेल्या विविध निर्णयांवर जर नजर टाकली तर विविध जाती गटांना खूश करण्यासाठीच हे निर्णय घेण्यात आले आहेत हे उघड आहे. विविध समाजासाठी स्थापन करण्यात आलेली आर्थिक विकास महामंडळे असोत किंवा अगदी शेवटच्या क्षणी महाराष्ट्र विधानपरिषदेवर बंजारा समाजाचे प्रतिनिधित्व करणारे धर्मगुरू बाबुसिंग महाराज राठोड किंवा मुस्लीम समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सांगलीचे इद्रीस नायकवडी यांची नियुक्ती पुरेशी बोलकी आहे.

हरियाणात भारतीय जनता पक्षाने अशाच प्रकारची रणनीती अवलंबून केवळ जाट समाजाला खूश न करता इतर सर्व समाज घटकांना खूश करण्याची भूमिका घेतली होती. त्याचा फायदा त्यांना मिळाला होता. तीच रणनीती आता महाराष्ट्रात वापरण्यात येत आहे. अर्थात, या सर्वांमध्ये सरकारची जी 'लाडकी बहीण' योजना आहे त्याचा फायदा सरकारी पक्षाला किती मिळतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या महिलांनी जर त्यांना झालेल्या आर्थिक समाधानाचे परिवर्तन मतदानामध्ये केले आणि सरकारी पक्षाला पाठिंबा दिला तर महायुतीला पुन्हा सत्ता मिळू शकते. साहजिकच प्रचारामध्ये 'लाडकी बहीण' योजना हाच विषय महत्त्वाचा ठरणार आहे. दुसरीकडे, विरोधी महाविकास आघाडीला मात्र एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार कसे घटनाबाह्य आहे आणि इतर राजकीय पक्षांची फोडाफोडी करून चुकीच्या पद्धतीने कशी सत्ता मिळवण्यात आली आहे याचा प्रचार करावा लागणार आहे. म्हणजेच एकीकडे आता सत्ताधारी बाकावरील राजकीय पक्ष, दुसरीकडे विरोधी बाकावरील राजकीय पक्ष, तिसरीकडे तिसरी आघाडी आणि इतर काही राजकीय पक्ष आणि चौथ्या बाजूला मराठा आणि ओबीसी संघटनांचा दबाव गट अशा पार्श्वभूमीवरच ही निवडणूक लढली जाणार आहे. ही निवडणूक एकाच टप्प्यात होणार असल्यामुळे मतदारांची मनस्थिती बदलण्याची शक्यताही खूप कमी आहे.

आगामी कालावधीमध्ये या सर्व आघाड्या निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने आपली बाजू कशाप्रकारे मांडतात आणि मतदारांची मनस्थिती आपल्यासाठी सकारात्मक कशी तयार करू शकतात यावर सर्व काही अवलंबून आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या प्रकारे मतदारांनी महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात कौल दिला होता त्याच्या आधारे महाविकास आघाडीसाठी जरी सकारात्मक वातावरण असल्याचे दिसत असले, तरी लोकसभा निवडणुकीनंतरच्या कालावधीमध्ये सत्ताधारी महायुतीने हे वातावरण बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. साहजिकच मतदार या सर्व गोष्टींना कसा प्रतिसाद देतो यावर सर्व काही अवलंबून आहे. म्हणजेच आगामी कालावधीमध्ये मतदार हा राजा असणार आहे आणि या लोकशाही उत्सवाची सर्व सूत्रे आता मतदाराकडेच गेली आहेत.

## शिवसंग्राम भीक मांगो आंदोलनास आखेर यश...

बीड । प्रतिनिधी

शहरातील राज हॉटेल ते नवी भाजी मंडई कॉर्नर पर्यंतचा रस्ता दुरुस्त करावा या मागणीसाठी शिवसंग्राम शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे यांनी शिवसंग्रामच्या माध्यमातून प्रयत्न केले होते. अखेर शहर शिवसंग्रामच्या या मागणीला यश आले आहे.हा रस्ता नगर परिषदने नुकताच मंजूर केला आहे.

लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांच्या संकल्पनेतून सदरचा रस्ता व्हावा यासाठी भिक मागो आंदोलन शिवसंग्रामच्यावतीने राबवण्यात आले होते. शिवसंग्रामने वारंवार याबाबत आंदोलन केलेली आहेत. तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांच्याकडेही यशस्वी पाठपुरावा करून या कामास गती प्रदान केलेली होती. शिवसंग्रामच्या रेट्यामुळे नगरपरिषदेने राज हॉटेल ते नवी भाजी मंडई कॉर्नर पर्यंतचा रस्ता दुरुस्तीस मंजुरी प्रदान केलेली आहे. या मंजूर कामांसाठी नगर परिषदने ६३ लाख रुपये तसेच राज हॉटेलच्या पाठीमागील रस्त्यासाठी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. पण त्याचे काम अजूनपर्यंत चालू झाले नाही तरी हे मंजूर झालेले काम त्वरित सुरु करा अशी मागणी शिवसंग्राम शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे यांनी केली आहे. राज हॉटेल ते भाजी मंडई कॉर्नर या रस्त्यावर फळभाजी खरेदी करण्यासाठी नागरीकांची मोठी गर्दी असते, तसेच हॉस्पीटल देखील आहे परंतू रस्त्याची दयनिय अवस्था असल्यामुळे अत्यावश्यक उपचारासाठी रुग्णवाहिका वाहतूक करण्यास मोठी करसत करावी लागत आहे.या भागातील जेष्ठ नागरिक अ‍ॅड. लोहिया, डॉ.येवले, डॉ.धायतडक, अ‍ॅड.कुलकर्णी, ओमसेठ बाहेती, राजु धुप्पड, ढाकणे सर आदींसह शिवसंग्रामचे शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे यांनी या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे अशी मागणी केली आहे.

## माजी आ.केशव आंधळे यांचे मार्गदर्शन आणि पुतणे सरपंच अ‍ॅड.मयुर आंधळे यांचा पाठपुरावा !

### रुई गांवच्या विकासासाठी १ कोटी ५ लाख रुपायाचा निधी मजुंर; ३५ घरकुलांना देखील मिळाली मंजुरी

वडवणी । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या सर्व योजना गांवपातळीवर १००% राबविणारी ग्रामपंचायत म्हणून वडवणी तालुक्यातील रुई गांवचा नामउल्लेख होतो. याच गांवच्या विकासासाठी विविध योजने अंर्तगत राज्य सरकारकडून आचारसंहितेच्या अगोदर तब्बल १ कोटी ५ लाख रुपायाचा निधी मंजुर झाला आहे. हा निधी आणण्यासाठी माजी आ. केशवदादा आंधळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे तर याबाबतचा पाठपुरावा पुतणे आणि गांवचे सरपंच अ‍ॅड.मयुरशेठ आंधळे यांनी केला असून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेतून गांवतील ३५ लाभार्थी यांना घरकुल देखील मजुंर केले आहेत.**





वडवणी तालुक्यातील मौजे रुई हे गांव पुनर्वसित गाव म्हणून ओळखले जाते. ही ओळख पुसण्यासाठी तसेच गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या गावचे भूमिपुत्र तथा चौसाळा मतदार संघाचे माजी आमदार केशवदादा आंधळे हे कार्य तत्पर आसतात. यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांचे पुतणे एडवोकेट सरपंच मयूरशेठ आंधळे यांची धडपड दिसून येते. तर राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचा बिगुल वाजण्या अगोदर राज्य सरकारकडून विविध योजनेअंतर्गत निधी मंजूर करुन घेण्याचा काम मयूरशेठ आंधळे यांनी केले आहे. यामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजने अंतर्गत ३५ लाभार्थीधारकांना घरकुल मंजूर केले आहे. तसेच २५/१५ या शासनाच्या योजने अंतर्गत संपूर्ण गावात एलईडी लाईटसाठी ३० लाख रुपयांचा निधी, तसेच गावातील रस्त्याच्या दोन्ही बाजूने अंडरग्राउंड नाली बांधकामासाठी २५ लाख रुपये, तर रोजगार हमी योजने अंतर्गत पेव्हिंग ब्लॉक बसवण्यासाठी २० लाख रुपये, गावात मूलभूत सोयीसाठी १० लाख रुपये, एमआरजीएस योजने अंतर्गत काँक्रिटीकरण रस्ता करण्यासाठी २० लाख रुपये अशा एकूण १ कोटी ५ लाख रुपयांचा निधी गावच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर केला आहे. सदरील निधी मंजुर केल्याबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे, विधान परिषदेच्या आमदार पंकजाताई मुंडे, मंत्री अतुलजी सावे, मंत्री गिरीशजी महाजन, मंत्री दादासाहेब भुसे या मंत्री महोदयांनी यासाठी विशेष निधी दिल्याबद्दल सरपंच मयुरशेठ आंधळे यांनी विशेष आभार मानले आहेत.

### सरपंच पटलावर मयुर आंधळे

रुई हे गाव पुर्नवसित गाव म्हणून राज्य शासनाच्या दरबारी आहे. परंतु या गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच नामांकित गावाच्या यादीत रुई गावच नाव विकास मॉडेल म्हणून बसविण्यासाठी या गावचे प्रथम नागरिक तथा उच्चभूषित सरपंच अ‍ॅड. मयूरशेठ आंधळे नेहमीच कोणते ना कोणते काम करून तालुक्याच्या पटलावर विशेष असा वेगळा ठसा निर्माण केला आहे. मनात इच्छाशक्ती आणि विकासाचा ध्यास ठेवून वाटचाल केली कि कामात यशस्वी नावाचा पासवर्ड नक्कीच पडतो. असं देखण काम मयुरशेठ आंधळे यांच्या हातून ठरत आहे.

## महायुतीच्या शिंदे सरकारने राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय दिला-अर्जुनराव खोतकर



जालना । प्रतिनिधी

**गत अडीच वर्षात तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम केले असून, त्यांचा अडीच वर्षाचा कालखंड हा खर्या अर्थात सुवर्णक्षरात लिहीण्यासारखा राहिलेला आहे, अशी माहिती शिवसेनेचे उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी दिली.**

१८ ऑक्टोंबर रोजी जूना जालना, भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर आयोजित पत्रकार परिषदेत खोतकर बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,राष्ट्रवादीचे अरविंदराच चव्हाण, रिपाइंचे अ‍ॅड. ब्रह्मानंद चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, फिरोजलाला तांबोळी, युवा सेनेचे राज्यसचिव अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना श्री. खोतकर पुढे म्हणाले की, अडीच वर्षात सरकारने जनतेच्या हिताचे निर्णय घेतले असून, महिलांना सक्षम करण्यासोबतच ज्येष्ठ, युवक, कष्टीकरी, शेतकरी यांना न्याय देण्याचे काम केले आहे. त्यासोबतंच शहरी भागात पायाभुत सुविधा उपलब्ध करून देण्याचा सरकारने प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. जनतेला दिलेला प्रत्येक शब्द सरकारने पुर्ण करण्यात प्रयत्न केला असून, इतरांचे सरकार आणि महायुतीचे राज्य यांची तुलनात्मक परिस्थिती पाहिल्यास त्यात निश्चितच युतीच्या राज्यात अधिक चांगल्याप्रकारे काम झाले असून, प्रामुख्याने त्यात २८ हजार ८०० कोटींची शेतकर्यांना मदत करण्यात आली आहे. केवळ मत मिळावे म्हणुन आपण हे बोलत नसून, महायुती सरकारचे काम जनतेसमोर आहे. त्यामुळे त्याचे फलीत आगामी विधानसभेत मिळेल, असा विश्वास व्यक्त करून खर्या अर्थाने जनतेपर्यंत या अडीच वर्षात विकास पोहोचल्याने जनता महायुतीच्या पाठीशी उभा राहिल, असा विश्वास श्री. खोतकर यांनी व्यक्त केला. तसेच महायुती सरकारच्या जनकल्याणकारी योजना भविष्यातही सुरु राहणार असून, कोणी कितीही फेक नरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न केलातरी त्यास जनता प्रतिसाद देणार नाही, असे सांगत त्यांनी महाविकास आघाडीला टोला लगावला. यावेळी बोलतांना अरविंद चव्हाण म्हणाले की, महायुती सरकारने राबविलेल्या योजनांमुळे गोरगरीबांच्या आयुष्यात खर्या अर्थाने गोडवा निर्माण झाला असून, आमच्या सरकारचे काम प्रभावी ठरणारे असल्याचे त्यांनी सांगितले तर अ‍ॅड. ब्रह्मानंद चव्हाण यांनी सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचवून महायुती सरकारने आपली छाप प्रत्यक्ष कृतीतुन दाखवुन दिली आहे असे म्हटले.

## पान १वरून...

### सरकारच्या धोरणांचा

राबवत असतात. सरकारच्या या धोरणांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरही परिणाम होत असतो. जगातल्या वेगवेगळ्या सरकारांच्या याच धोरणांचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर कसा परिणाम होतो? याचा अभ्यास ओईसीडी या संस्थेने केला आहे. प्रत्येक देशांच्या सरकारांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या जी धोरणे, योजना आणि कार्यक्रम राबविले त्याचा एकत्रित परिणाम सकारात्मक झाला कि नकारात्मक झाला याचे विश्लेषक करण्यात आले आहे. जसे की भारत सरकार शेतकऱ्यांना काही अनुदान, थेट लाभ, विकास कार्यक्रम राबवते. पण दुसरीकडे निर्यात बंदी, निर्यात निर्बंध, खुली आयात, किंमत नियंत्रण आदी धोरणे राबविते. या सर्वांचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर काय परिणाम होतो? हा परिणाम सरारात्मक आहे की नकारात्मक आहे? याचा अभ्यास करण्यात आला. भारत सरकारच्या एकत्रित धोरणांचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर नकारात्मक परिणाम झाला, असे या अहवालात म्हटले आहे. ऑईसीडी या संस्थेने सरकार शेतकऱ्यांना मदत करत असलेल्या विविध मार्गांचा अभ्यास केला. यात बाजार भावावर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम करणाऱ्या धोरणांचा समावेश आहे. यात प्रामख्याने आयात शुल्क, निर्यात शुल्क, किमान आणि कमाल भाव मर्यादा या धोरणांचा अभ्यास केला आहे. सोबतच शेतकऱ्यांना पीक उत्पादनावर दिलेल्या मदतीचा समावेश आहे. तसेच खते, वीज आणि पशु खाद्यावर देण्यात येणाऱ्या अनुदानाचाही समावेश आहे. या अनुदानाचा दक्षिण आफ्रिका, व्हिएतनाम, भारत आणि ऑस्ट्रेलियातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सकारात्मक परिणाम झाल्याचे अहवालात म्हटले आहे. जगातील केवळ तीन देशांमध्येच सरकारी धोरणांचा नकारात्मक परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे. त्यातही भारतातील शेतकऱ्यांना त्याचा सर्वाधिक फटका बसतो, अशा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

-----------

### मविआच्या मतदारांची नावे यादीतून

५० हजार रुपयांवर नियुक्त केले असून हे योजनादूत भाजपा विचारांचे आहेत व ते भाजपाचा प्रचार करत आहेत. जनतेच्या पैशाने सुरु असलेला हा भाजपाचा प्रचार तात्काळ बंद करा असा इशाराही यावेळी त्यांनी दिला. या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विधानसभा विजय वडेट्टीवार, सीडब्ल्यूसी सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी ऊर्फ पाटील, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खा. अनिल देसाई, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) आ. जितेंद्र आव्हाड, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची नियुक्ती व त्यांना दिलेली मुदतवाढ ही असंवैधानिक व बेकायदेशीर आहे त्यांना हटवण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली पण त्यांना बदलू शकत नाही असे आयोग सांगतो पण याच निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालच्या निवडणुकीवेळी मात्र तिथल्या पोलीस महासंचालकांना बदलले. पश्चिम बंगाल व महाराष्ट्रासाठी वेगळे कायदे आहेत का, असा सवालही यावेळी केला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत ज्या मतदारसंघात मविआला जास्त मते पडली त्या मतदारसंघात साधारणपणे १० हजारावर मते कमी करण्याचे षडयंत्र सुरु आहे. भाजपा युती विधानसभा निवडणूक जिंकू शकत नाही म्हणून फॉर्म७ चा गैरवापर केला जात आहे म्हणून फॉर्म ७ घेणे बंद करा व पुन्हा असे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्या. मतदार ओळखपत्रातही अनेक चुका आहेत. मतदारांनीही आपले नाव मतदार यादीत आहे का याची खात्री करावी, असे आवाहनही केले. निवडणुका जाहिर झाल्या त्यावेळी सरकारने काढलेले सर्व जीआर व महामंडळाच्या नियुक्त्या रद्द कराव्यात अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली असल्याचेही यावेळी सांगितले.

------------

### जो पर्यंत सर्वसामान्य माणूस माझ्या सोबत

फैयाज भाई,अशोक तळेकर, गोरख कर्डिले,संतोष भंडारी,संपत शेळके, नागेश कर्डिले, हरून शेठ,शहादुला बेग,हेमंत पोखरणा,योगेश भंडारी,दर्शन कांकरिया,रतिलाल कटारिया, कल्याण भोसले,अजित बोरा यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना धस म्हणाले की,ज्या वेळी कडा बाजारपेठ माझ्या ताब्यात आली त्या वेळी साधं पोताड्याच हॉटेल असणार कडा मार्केट आज त्या मार्केटचा कांदा दुबईला जात आहे.परळी येथे खत साठा करायचे रॅक होते.ते अहील्यानगराला आणण्याचे काम मी केले.त्यामुळे वाहतूक कमी होऊन व्यापाऱ्यांना ते सोयीस्कर मिळण्यास मदत झाली.खताचा पुरवठा वारंवार आपल्याला कमी मिळत होता त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून तो पुरवठा व्यवस्थित करण्यासाठी प्रयत्न केला.आज एकही कृषी दुकानदाराची खताच्या कमतरतेबाबत तक्रार नाही.व्यापाऱ्यांमध्ये किमान ८ दिवसातून एकदा बसून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतो त्याच निरसन करण्याचं काम करतो.आयुष्यात मदत करताना कधीच हिशोबाची डायरी ठेवली नाही.म्हणूनच लाखोंनी माणसं जोडत गेली.ती आजही सत्ता असो अथवा नसो ती कायम माझ्यासोबत आहेत हीच माझी संपत्ती असल्याचे सांगत मच्छिंद्रनाथ गडावर २१ कोटी रुपयांची विकास काम सुरू आहे.त्याचा कायापालट करण्याचं काम मी केलं.देवस्थानाला १९ एकर जमीन होती आता १५० एकर जमीन झाली.आष्टी तालुक्यात सव्वादोन टीएमसी पाणी मी आणून दाखविले आहे.वेळ आली की ते पुराव्यासह तुमच्यासमोर सिध्द करून दाखवणार आहे.५८ टी एम सी जे पाणी आलेलं आहे ते भविष्यामध्ये पाटोदा आणि शिरूर तालुक्याला वळवणार हा प्रामाणिकपणे शब्द तुम्हाला देतो म्हणत माझा मोबाईल दिवस रात्र माझ्या जवळ असतो कारण कधी कुणाची काय अडचण असेल ती सांगता येत नाही परंतु एक सांगतो ज्या दिवशी मोबाईल बंद करील हॉल मध्ये ठेवीन त्या दिवशी मी माझ राजकारण बंद करीन.रात्रंदिवस झटाव लागतं तेव्हा माणसं जमतात.स्वतःच्या स्वार्थासाठी काही जण जातीपातीचे राजकारण करू पाहत आहेत ही जनता माझ्या पाठीशी आहे तो पर्यंत मी कशालाच घाबरत नाही असे शेवटी धस म्हणाले.यावेळी हजारो व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------

### आघाडी आणि युती

दोघांना पहिले पाडायचे आहे. जसे इतर पडतात तसे मोठे नेतेही पडतील. जरांगे पाटील संबंधात माझे काही बोलने झालेले नाही. माझ्या मतदारसंघातील लोकांचा माझ्यावर विश्वास आहे आणि मी तिथूनच लढणार, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांशी माझी चर्चा झाल्याची बातमी वृत्तवाहिन्यांनी दाखवली. मात्र, मी मुख्यमंत्र्यांच्या घरी गेलोच नव्हतो. त्या दिवशी हैद्राबादमध्ये होतो, असा दावाही आ. कडू यांनी केला.

-----------

### महाराष्ट्रातील रस्ते प्रकल्पांमध्ये १० हजार

कामांच्या तुलनेत बांधकाम खर्चात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. काही प्रकल्पांमध्ये ''बोगदा-अनुभव'' कलम जाणीवपूर्वक अटींमध्ये टाकण्यात आले जेणेकरून विशिष्ट कंपन्या निविदांसाठी पात्र होऊ शकतील आणि इतर कंपन्यांना वगळता येईल. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या किंमतीनुसार बांधकाम खर्चावर आधारित प्रकल्पांची वास्तविक किंमत १०,०८७ कोटी रुपये असायला हवी होती, मात्र महाराष्ट्र सरकारने २०,९९० कोटी रुपये दिले आहेत, असा दावा करत हा मोठा दरोडा असल्याचे खेडा म्हणाले. भाजपवर खंडणीचा आरोप करत खेडा यांनी भाजपची तुलना डी-कंपनीशी केली आणि भाजपचे वर्णन बी-कंपनी असे केले, भाजप डी-कंपनीप्रमाणे लोकांकडून पैसे उकळत असल्याचा खेडा म्हणाले. खेडा म्हणाले की, एप्रिल २०२३ मध्ये, एमएसआरडीसीने पुणे रिंगरोड प्रकल्पासाठी पात्रता विनंती आमंत्रित करण्यास सुरुवात केली, ज्याची व्याख्या बोगदा प्रकल्प म्हणून करण्यात आली होती. यासाठी विविध कंपन्यांनी अर्ज सादर केले. कारण नसताना या प्रकल्पांना बोगदा प्रकल्प म्हणून सांगण्यात आले. जून २०२३ मध्ये, कंपन्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर एमएसआरडीसीने पुन्हा निविदा उघडल्या आणि २८ कंपन्यांनी अर्ज सादर केले. डिसेंबर २०२३ मध्ये २८ कंपन्यांची मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण झाली ज्यामध्ये १८ कंपन्या पुढील फेरीसाठी पात्र ठरल्या आहेत. यापैकी पात्र ठरलेल्या कंपनीने जुलै २०२३ मध्ये इलेक्टोरल बाँडमध्ये देणगी दिली होती, असाही दावा खेडा यांनी केला.

-----------

### आरक्षण मिळाल्याने नोकरी लागत

ढाकणे ऍड रत्नदीप निकाळजे माजी जि प सदस्य वर्षा माळी शंकर देशमुख युवराज सोनवणे,आरपीआयचे अशोक साळवे, आदी उपस्थित होते यावेळी भीमराव धोंडे पुढे बोलताना म्हणाले की मी माझ्या राजकीय कार्यकाळात कधीही जातीभेद केला नाही तसेच कायम बंधू भाऊ जपण्याचे काम केले आहे. मात्र आता तशी परिस्थिती राहिली नसून नऊ जुलै पासून मतदार संघामध्ये दौरा केला या दौऱ्या दरम्यान भटक्या विमुक्त जाती जमातीच्या समस्या जाणून घेतल्या व या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळाच झाला आहे यामुळे सर्व मागासवर्गीय भटके मुक्त यांनी एकत्र येण्याची ही गरज असून सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावर संपूर्ण महाराष्ट्र पेटला पण आरक्षणापेक्षा बुद्धिमत्तेला जास्त महत्त्व आरक्षणांनी नव्हे तर बुद्धिमत्तेने नोकरी लागतात . तसेच कडा शहरात बसवण्यात आलेला डॉक्टर आंबेडकरांचा पुतळा आम्ही स्वतः स्वखर्चाने बसवला होता भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस अजय धोंडे म्हणाले की भीमराव धोंडे साहेबांच्या २०१४ ते २०१९ पर्यंतच्या त्यांच्या कार्यकाळात फक्त विकासाची राजकारण केले आणि त्या काळात मतदार संघात सर्वात अधिक मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून तसेच इतर योजनेतून मोठ्या प्रमाणावर रस्ते केले जर या निवडणुकीत आपल्याला पक्षाने उमेदवारी नाकारली तरी अपक्ष निवडणूक लढवून निवडून आणायची मतदारांना अजय धोंडे यांनी आव्हान केले. यावेळी रत्नदीप निकाळजे म्हणाले की भीमराव धोंडे यांनी त्यांच्या सत्तेच्या काळात सार्वजनिक विकास केला आहे तसेच भटके विमुक्त मागासवर्गीय समाजाला खंबीरपणे पाठीशी राहिले असल्याने यावेळेस त्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहावे व त्यांना मताधिक्य द्यावे तसेच आपल्यावर जो बिकाऊपणाचा डाग लागला आहे तो पुसण्याचा काम सर्व भटके मुक्त मतदारांनी करावे .असेही निकाळजे म्हणाले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष साहेबराव मस्के म्हणाले की २०१९ चा पराभव हा समोरून झाला नसून पाठीमागून झाला आहे तसाच आता सध्या देखील पंकजाताई मुंडे यांचा लोकसभेला पराभव झाला आहे आपल्यातलाच लोकांनी आपला घात केला या असल्याचे सांगत भाजपा पक्ष आपल्याला उमेदवारी देणार नाही त्यामुळे आपल्याला धाडसी निर्णय घ्यायची वेळ आली आहे अशा प्रकारे भाजपा तालुका अध्यक्ष साहेबराव मस्के यांनी भीमराव धोंडे यांची भाजपाचे उमेदवारी नसल्याचे संकेतच दिले लक्ष्मी लॉन्स मध्ये भटक्या आयुक्त जाती-जमातीच्या संवाद मेळाव्याला माजी आमदार भीमराव धोंडे यांना मोठा प्रतिसाद महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित मेळावा संपन्न झाल्यानंतर उपस्थितांना शाकाहारी व मांसाहारी जेवणाचा केला होता बेत.

-----------

### रश्मी बर्वेंना सर्वोच्च न्यायालयाचीही

करण्यात आली, असे मौखिक ताशेरेही यावेळी ओढण्यात आले.

प्रकरणावर न्यायमूर्तीद्वय भूषण गवई व के. व्ही. विश्वनाथन यांच्यासमक्ष सुनावणी झाली. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने पारशिवनी तालुक्यातील गोडेगाव टेकाडी येथील वैशाली देवीया यांच्या तक्रारीची दखल घेऊन २८ मार्च २०२४ रोजी बर्वे यांचे चांभार अनुसूचित जातीचे वैधता प्रमाणपत्र रद्द केले केले होते. त्याविरुद्ध बर्वे यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका २४ सप्टेंबर २०२४ रोजी मंजूर करण्यात आली व रेकॉर्डवरील ठोस पुरावे लक्षात घेता बर्वे यांचा चांभार अनुसूचित जातीचा दावा सिद्ध होत असल्याचे जाहीर करण्यात आले. तसेच, बेकायदेशीर कृती केल्यामुळे समितीवर एक लाख रुपये दंड ठोठावण्यात आला. राज्य सरकारचा या निर्णयावर आक्षेप होता. परंतु, सर्वोच्च न्यायालयाला सरकारच्या मुद्यांमध्ये तथ्य आढळून आले नाही. सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल वरिष्ठ अ‍ॅड. तुषार मेहता तर, बर्वे यांच्यावतीने वरिष्ठ अ‍ॅड. दामा शेषाद्री नायडू, अ‍ॅड. शैलेश नारनवरे व अ‍ॅड. समीर सोनवने यांनी कामकाज पाहिले.

-----------

### जातीपाती वर येऊन ठेपलेल्या

मतदानासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहे. यातच आष्टी पाटोदा शिरूर (का) विधानसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात सरळ लढत होणार असल्याचे सध्या तरी चित्र आहे. अद्याप कोणत्याही पक्षाची उमेदवारी जाहीर नसली तरीही इच्छुकांनी मात्र गावभेट दौरे, कार्यकर्ता मेळावे घेऊन निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू केली आहे. आष्टीच्या जागेसाठी वरीष्ठ पातळीवरून तिढा सुटला नाही तर बॅलेट मशीनवर वेगळे चित्र पहावयास मिळेल हे मात्र नक्की. आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघ हा मराठा बहुल आहे. तसेच ओबीसी मतदानाचा आकडा देखील लाखाच्या वर आहे. मुस्लिम आणि दलित मतदान पन्नास हजाराच्या आत असून निर्णायक आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या जातीय विभागणीचे पडसाद अख्या जिल्ह्याने पाहिले आहे. विधानसभा निवडणुकीत देखील जातीय समीकरण महत्वाचे मानले जात आहे. जो उमेदवार जातीय समतोल राखण्यात यशस्वी होईल तोच मतदारसंघाचे नेतृत्व करेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

---------------------

### बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक

रोखण्याची गरज असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले. केंद्रीय महिला आणि बाल मंत्रालयाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निर्देश द्यावेत, असे न्यायालयाने म्हटले आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर हा निकाल देण्यात आला.

----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४


## परवाना धारकांनी शस्त्र पोलिस ठाण्यात जमा करावेत

**जालना । प्रतिनिधी**

भारत निवडणुक आयोगाच्या सुचनानुसार जालना जिल्ह्यामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ चा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यत, परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करण्यात येत आहेत. तरी असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलिस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी तसेच सराफा यांच्या व्यतिरिक्त तसेच मा. उच्च न्यायालयातील जुन्या रिट पिटीशन २००९/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन इतर सर्व परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास आदेशान्वये बंदी घालण्यात आली आहे. शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र जवळच्या पोलिस ठाण्यात जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एका आठवड्याचे आत संबधितांचे शस्त्रे परत करण्यात यावेत. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# २१ मुले शिक्षणापासून वंचित; शाळाबाह्य सर्वेक्षणाचे लाखो रुपये पाण्यात, अनेक मुले शाळाबाह्य

## शाळेच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे- तत्त्वशील कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

**शासनाच्या आरटीआय नुसार सर्व मुले शाळेच्या प्रवाहात आली पाहिजेत. या शासनादेशानुसार अनुसूचित जातीतील या सर्व मुलांना शाळेच्या मुख्य प्रवाहात सांगून सामील करून घेण्यात यावे. व दोषी अधिकारी कर्मचाऱ्याविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी बाल हक्क कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी केली आहे.**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ नुसार प्रत्येक मूल शाळेत यावे, टिकावे आणि शिकावे यासाठी विविध उपक्रम राबवून लाखो रुपये एकीकडे शासन खर्च करत आहे. दुसरीकडे संबंधित शिक्षण विभागाच्या यंत्रणेला याचे काही देणे घेणे नाही. केज तालुक्यातील टाकळी केंद्रातील पवार वस्तीवर अनुसूचित जमातीतील २१ शाळाबाह्य मुले आहेत. याप्रकरणी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्यानंतर सदर मुलांसाठी शाळेची उपलब्ध करून दयावी, असे पत्र जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा चेअरमन जिल्हा विधि प्राधिकरण सेवा यांनी दिल्यामुळे खळबळ उडाली आहे.

या संदर्भात माहिती अशी की, प्रत्येक मूल शाळेत जावे, टिकावे आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी केंद्राने राज्य शासनाच्या वतीने लाखो रुपये खर्च करत आहे. दरवर्षी यासाठी गाव स्तरावर सर्वे केला जातो याची माहिती तालुका जिल्हा आणि राज्याला दिली जाते. मात्र केज तालुक्यातील पवार वस्तीवरील वंचित घटकातील मुलांना आतापर्यंत शाळा बघायलाही मिळाली नाही. दिन, दलित वंचित आणि असुशिक्षित असलेल्या अनुसूचित जमातीतील मुलांना शाळेमध्ये सामावून घेण्यात आलेले नाही. एकीकडे विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी खर्च होत असलेले लाखो रुपये पाण्यात जात आहेत. दुसरीकडे मात्र अनेक मुलांना शाळेच्या प्रवाहात सामावून घेतले जात नाही, असा धक्कादायक प्रकार केज तालुक्यातील पवारवस्ती येथील शाळाबाह्य मुले आढळून आल्याने दिसून आले आहे. याबाबत जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा चेअरमन जिल्हा विधी न्याय सेवा प्राधिकरण आनंद यावलकर यांनी दि. १५ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रानुसार बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना याबाबत पत्र लिहून पवारवस्ती या ठिकाणी सदर मुलांसाठी शाळेला मान्यता देऊन विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्याबाबत विनंती केली आहे. या पत्रामुळे जिल्ह्यातील शिक्षण विभागाची पर्यवेक्षीय यंत्रणा काय करते? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या संदर्भात सदर भागातील शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी जबाबदार आहेत.

## नवोदित धम्मचारी सत्कार व वर्षावास समारोपाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**



त्रिरत्न बौद्ध महासंघ या जागतिक धर्म चळवळीचे सदस्य म्हणून आपल्या माजलगावचे भूमिपुत्र धम्ममित्र बन्सी रणदिवे यांची धम्मचारी दीक्षा दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी उर्गेन संघरक्षित ध्यान भावना केंद्र वारकवाडी जिल्हा नांदेड येथे झाली आहे. त्यानिमित्त त्यांचा सत्कार समारंभ तसेच भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथ वाचनाचा समारोप समारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक,जय भीम नगर, माजलगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान धम्मचारी सत्यदीप (पुणे) हे भूषविणार आहेत. प्रवचन धमचारी मंजूचित्त (पनवेल ) यांचे होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे धम्मचारी सामसिद्धी (पुणे) धम्मचारी ज्ञान संभव (पुणे) यांची उपस्थिती लाभणार आहे. दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी दुपारी १२:००वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक जय भीम नगर माजलगाव या ठिकाणी हा समारंभ पार पडणार असून. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांना भोजनदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्रिरत्न बौद्ध महासंघ माजलगावचे अध्यक्ष धम्मचारी अमोलरत्न सर्व धम्ममित्र आणि जय भीम नगर येथील महिला मंडळ यांनी केले आहे.

## समाजभूषण पुरस्कार प्रदान; गुणवंत विद्यार्थ्यांना धनादेशांचे वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार वितरण तसेच शुक्ल यजुर्वेदीय माध्यदिन महाराष्ट्रीय ब्राम्हण मध्यवर्ती मंडळ यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वाटप असा संयुक्त कार्यक्रम नुकताच उत्साहात संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,मुख्याध्यापिका स्वरूपा कुलकर्णी पत्रकार प्रशांत बर्दापूरकर ,मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर सेलमुकर,बाबुराव बाभुळगाव कर, आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना मुंदडा म्हणाले की, सामाजिक कार्यात जवाबदारीने सहभाग घेऊन ते कार्य यशस्वी करणाऱ्यांचा समाजभुषण पुरस्कार देऊन गौरव करावा ही बाब लक्षात घेऊन योगेश्वरी वधु - वर सुचक मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील व्यक्तिंना शोधून पुरस्कार देऊन गौरविले ही बाब प्रेरणादायी आहे

या गुणवंतांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा असेही ते म्हणाले

मुख्याध्यापिका स्वरूपा कुलकर्णी म्हणाल्या की,प्रत्येकांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले त्याची दखल घेऊन मंडळाने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविले ही बाब अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येकाने समाजात उदभवणाऱ्या समस्यांवर विचार करून त्या सोडविल्या तर कमी होतील व त्यावर उपाय निघेल.प्रारंभी मंडळाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत राहूल देशपांडे,राजश्री पिंपळे,स्मिता भातलवंडे यांनी केले. प्रास्तविक श्रीपाद चिक्षे यांनी केले, संचालन प्रशांत बर्दापुरकर यांनी तर उपस्थितांचे आभार बाबुराव बाभुळगांवकर यांनी मानले.या कार्यक्रमास महिला, नागरीक उपस्थित होते

समाजभूषण पुरस्कार

योगेश्वरी वधु वर सूचक मंडळाच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा.शशीकांत पसारकर सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिक्षा जोशी,वधु-वर मंडळातील योगदाना बद्दल अशोक टाकळकर यांना तर वैद्यकीय क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल डॉ.गौरी कुलकर्णी यांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## वंजारी समाज भवनासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही -अर्जुनराव खोतकर



जालना । प्रतिनिधी

शिवसेना हा पक्ष नेहमीच वंजारी समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला असून भविष्यातही राहील, यात कोणतीही शंका नाही. त्यामुळेच आपण देखील वंजारी समाज भवनासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलतांना दिली.

जुना जालना भागातील भगवान सेवा मंडळाच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात श्री. खोतकर बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, मेघराज चौधरी यांची विशेष उपस्थित होती. तर या कार्यक्रमासाठी अशोकराव आघाव, गतत घुगे, मुरलीधर काकड, राजेंद्र राख, डॉ. चौरे, भगवान सेवा मंडळाचे श्रीमंतराव मिसाळ, गजानन गिते, विजयकुमार वाघ, मधुराज डोईफोडे, महादेव आघाव, के. पी. विघ्ने, विलास जायभाये, बंडु इघारे, उध्दवराव जायभाये, बाबासाहेब गिते, शेषराव वाघ, ओमप्रभू नागरे, आदींची उपस्थिती होती. वंजारी समाज भवनासाठी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी पाठपुरावा केला होता. त्याअनुषंगाने बोलतांना श्री. खोतकर पुढे म्हणाले की, वंजारी समाजासाठी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळ व्हावे, अशी मागणी नुकतीच जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी माझ्याकडे केली होती. याची दखल घेऊन आपण समाजाच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेऊन महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी त्यांच्याकडे केली व मुख्यमंत्री महोदयांनी त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. यानंतर जालना येथे खा. श्रीकांत शिंदे आले असता भाऊसाहेब घुगे यांच्या विनंतीवरुन वंजारी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींची बैठक घडवून आणली. समाजाच्या महामंडळासह विविध मागण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. समाज भवनासाठी भाऊसाहेब घुगे यांच्या मागणीनुसार पहिल्यांदा पन्नास लक्ष रुपयांचा आणि नंतर ऐंशी लक्ष रुपयांचा निधी मंजूर केल्याचे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, वंजारी समाजासाठी सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. वंजारी समाजासाठी महामंडळ व्हावे, याकरीता मी आपल्याकडे, खा. श्रीकांत शिंदे, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे सतत पाठपुरावा केला व महामंडळ स्थापन होईपर्यंत समाजबांधवांना सोबत घेऊन पाठपुरावा करणार आहे. जालना शहरामध्ये समाज बांधवांकरिता, गोरगरीबांच्या मुला- मुलींच्या शिक्षणासाठी एक सुसज्ज वस्तीगृह व्हावे, या करीता एक कोटीचा निधी मंजूर करावा, अशी मागणीही श्री. घुगे यांनी श्री. खोतकर यांच्याकडे केली व ती मंजूर करुन आणावी लागेल, तेवढा निधी देण्याचे आश्वासन श्री. खोतकर यांनी दिले. यावेळी भगवान सेवा मंडळाचे श्रीमंतराव मिसाळ, अध्यक्ष राजेंद्र राख यांचीही यां कार्यक्रमास शिवसैनिकांसह वंजारी समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान १वरून...

### मुलींना हवाय शहरातला

पाहायला मिळत आहे. अगदी शेतकरीही आपली मुलगी नोकरदाराला द्यावी, यावर ठाम असतात. मग अशा मुलांनी करायचं काय? असाही सवाल बोहल्यावर चढू पाहणाऱ्या युवकांमधून होऊ लागला आहे. शेतकऱ्यांच्या घरात लग्न करण्याच्या मनःस्थितीत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

मुलगा पदवीधर असला, तरी त्यास चांगली बागायती व उत्पन्न देणारी शेती असली, तरी मुलींना शेतकरी नवरा नकोय. शहरात राहणारा, नोकरी करणारा मुलगा पसंत करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यामुळे ३५ ते ४० वर्षांचे वय आहेत. होऊनसुद्धा शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. याचा विचार करून याविषयी प्रबोधन होणे गरजेचे आहे. वय होऊनही लग्न जमत नसल्याने नाइलाजाने पुण्याला कंपनीत कामाला पाठवले जातआहे. आता लग्न जमतील अशी त्यांना आशा आहे. गल्लोगल्लीत युवकांचे टोळके एकत्र बसून एकमेकात लग्नाच्या चर्चा करत असून लग्न जमत नसल्याने अनेकांचे मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे. शिवाय आईवडिलांना लग्नाची चिंता लागून राहिल्याने त्यांना मधुमेह रक्तदाबाचे आजार झाले आहेत. लग्न समस्येने चिंताग्रस्त झालेले अनेक युवक व्यसनी होऊन व वाम मार्गाला लागले आहेत.

### द लास्ट ट्रूथ फाउंडेशन

स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत केली.

या सामाजिक कार्यात माजलगाव तालुका व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष चे मालक सुरेंद्र रेदासनी, बालाजी सुपरमार्केट चे मालक कपिल पगारिया तसेच सुपर कॉम्पुटर चे संचालक देविदास दराडे, अमोल धारक तसेच भारत टाकणखारसर, नितीन काळे यांनी मोलाचे सहकार्य केले. द लास्ट ट्रूथ फाउंडेशनने राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे संपूर्ण जिल्हाभरामध्ये कौतुक होत आहे. आपल्या कोणाकडे चालू स्थितीतील असलेले व वापरात नसलेले संगणक किंवा लॅपटॉप असतील तर संस्थेला दान करावेत जेणेकरून आणखी दिव्यांग व्यक्तींना मदत करता येईल असे आवाहन संस्थेचे सहसचिव प्रा. रमेश टाकणखार सर यांनी केले. संस्थेचे जिल्हा समन्वयक मानव पोटभरे, चेतन निसर्गंध, प्रतिज्ञा तुपारे, अमोल पुंडगे व राहुल दिडवाले यांनी सेंटर स्थापनेत सर्वांना मोलाचे सहकार्य केले.

### काकडहीरा ग्रामस्थांकडून

महाराजांना घालण्यात आला. गावात त्यांच्या स्वागतासाठी पुण्यावरून ढोल पथक मागविण्यात आले. सध्या क्षेत्र भगवान गड येथे ऐतिहासिक आणि भव्य असे संत ज्ञानेश्वर माऊलींचे मंदिर बांधले जात आहे. या मंदिरासाठी मौजे काकडहिरा ग्रामस्थांनी ६५ लाख रुपये देणगी देण्याचा संकल्प गडाचे महंत शास्त्री बाबा यांच्या उपस्थितीत जाहीर केला.

### अल्पवयीन मुलीवर

३७६(१),३७६ (२) (एन),५०६ भादंवी व कलम ४,६,८,१२ पोक्सो ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल होवुन संपुर्ण तपासाअंती मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड भारत के. खांडेकर यांनी एकूण ०६ साक्षीदार तपासले. त्यात पिडीता, फिर्यादी, इतर साक्षीदार तसेच तपासीक अंमलदार बी.यु. कदम पोलीस उप निरीक्षक, पिंक मोबाईल पथक, परतुर यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. तसेच सपोनि श्री इंगेवाड, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आष्टी यांनी वेळोवेळी सरकारी पक्षाला मदत केली. मा. न्यायालयापुढे सरकारपक्षातर्फे आलेला साक्षीपुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेवून मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, यांनी आरोपी प्रकाश वाघमारे, या आरोपीने लैंगीक अत्याचार केल्याप्रकरणी कलम ३७६ भा.द.वी. व कलम पोक्सो ३,४ पोक्सो कायदयानुसार वीस वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी १२ हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली.

### माजलगाव येथे नशामुक्ती

निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी उपस्थित राहुन मार्गदर्शन केले. नशामुक्ती अभियान शिबिरात सर्वप्रकारच्या व्यसनावर मार्गदर्शन करुन मोफत तपासणी, औषधी उपचार करण्यात आले.ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगावचे मौलाना माजिद साहब नदवी, मुफ्ती शब्बीर साहब,मुफ्ती अय्यूब साहब,हाफ़िज़ अब्दुल रहीम साहब, मौलाना कलीम साहब,मौलाना वहीद, हाफिज उमेर, हाफिज दाऊद साहेब,,सय्यद सज्जाद राज, वसीम अत्तार, शेख साहील,जुनेद पठाण सर, फारुक अण्णा ,शेख अजहर,मोमीन ओवाईस,शेख शकील यांनी विशेष परिश्रम करुन हे शिबिर यशस्वी केले तसेच दुसरा टप्पा नशामुक्ती अभियान शिबिर दि.२० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत जुनी नगरपालिका समोर आयोजित करण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी अशी माहिती ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगाव पदाधिकारींनी दिली.

## ॲड.नरसिंह जाधव यांना उमेदवारी दिल्यास विजय निश्चित -ॲड.विशाल मस्के

**जालना । प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून आता इच्छुकांची गर्दी पक्ष श्रेष्ठींकडे तिकिटासाठी धावपळ करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे, अशातच जनतेच्या मनातील उमेदवाराला जर तिकीट मिळाले तर त्या उमेदवाराच्या विजया साठी जनता ही तन मन धन वापरून काम करते आणि आपल्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी प्रयत्न करत असते. प्रत्येक मतदार संघाला योग्य उमेदवार मिळणे गरजेचे असते. ॲड. नरसिंह जाधव हे देखील आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून निवडणूक लढवण्यासाठी यावेळी इच्छुक असून मतदार संघातील जनतेच्या मनात त्यांचे पारडे जड असल्याचे बोलले जात आहे.

ॲड.नरसिंह जाधव हे पाटोदा येथील रहिवाशी असून ते सध्या औरंगाबाद उच्च न्यायालयात वकिली करत आहेत, त्यांचे वडील कै. ॲड. लक्ष्मणराव जाधव हे सन १९७८ पासून शरदचंद्र पवार यांच्यासोबत सहकारी म्हणून काम करत होते, त्यांचे बंधू देखील शरद पवार यांच्या पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष आहेत तसेच स्वतः ॲड. नरसिंह जाधव हे देखील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश विधी विभागाचे उपाध्यक्ष व मराठवाडा प्रमुख आहेत, एकंदरीत पाहता ॲड. नरसिंह जाधव हे दोन पिढ्यांपासून शरद पवार साहेबांचे निष्ठावंत म्हणून काम करत आलेले आहेत, तसेच त्यांचे काम देखील मतदार संघात चांगले असून लोकांच्या मनात त्यांच्या विषयी आपुलकीची भावना आहे. त्यामुळे मतदार संघात त्यांच्या पेक्षा तगडा आणि निष्ठावंत, उच्चशिक्षित नवीन चेहरा दुसरा कोणीही नाही त्यांना जर उमेदवारी मिळाली तर मागील अनेक वर्षापासून होत असलेला मतदार संघाचा तोटा ते नक्कीच भरून काढतील अशी भावना जनसामान्यांची आहे, त्यामुळेच जिल्ह्यातील प्रसिद्ध साहित्यिक,वात्रटिकाकार तथा अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. विशाल मस्के यांनी ॲड. नरसिंह जाधव यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाची उमेदवारी मिळाल्यास पुर्ण ताकतीने संपूर्ण मतदार संघात कार्यकर्यांसह स्वतः फिरून त्यांचा प्रचार करणार असून ॲड. नरसिंह जाधव यांना विजयी करणार असल्याची माहिती दिली असून ॲड. नरसिंह जाधव यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाची उमेदवारी मिळाल्यास ते नक्कीच विजयी होतील अशी परिस्थिती आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील आहे.

## 'प्रिय आई-बाबा, मतदान नक्की करा' विद्यार्थ्यांची पालकांना पत्राद्वारे विनंती

अंबाजोगाई प्रतिनिधी




'प्रिय आई-बाबा चला मतदान करू या' अशा आशयाचे पत्र लिहून विद्यार्थ्यांनी पालकांना मतदान करण्यासाठी विनंती केली. तालुक्यातील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (दि. १८) मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राज्यात विधानसभेच्या निवडणूकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणूकीमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे यासाठी स्वीप पथकाचे प्रमुख तथा गटशिक्षणाधीकारी चाँद शेख, केंद्रप्रमुख आर. जी. पवार, जेष्ठ शिक्षण विस्तार अधीकारी बी. के. नांदुरकर, मधुकर सुवर्णकार, विषतज्ञ सुंदर नेहरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती अभियान तालुक्यात राबविण्यात येत आहेत. नागरीकांनी मतदान प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन लोकशाही बळकट करावी या उद्देशाने विविध मतदान जनजागृतीचे कार्यक्रम राबवीण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या आई-वडीलाने मतदानाला प्राध्यान देऊन मतदान करावे या उद्देशाने तालुक्यातील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मतदान करण्या बाबतची विनंती करणारे पत्र विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडीलांना लिहून त्यांना मतदान करण्याची विनंती पत्राव्दारे केली. या वेळी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या सहसचिव व्हि. जे. शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य एन. के. हजारे, स्विपचे ब्रँड अँबेसिडर प्रा. पी. एस. तरकसे, एस. एन. घुले, एस. व्ही. देशमुख, ए. एस. पवार, व्ही. व्ही. तपकिरे, एस. बी. पवार, श्रीमती ए. व्हि. दळवी, जे. के. शेळके उपस्थित होते.

## घनसावंगीत वंचित बहुजन आघाडीकडून कावेरी खटके यांना उमेदवारी

### राजेश टोपे यांना शह देण्यासाठी ओबीसी आंदोलक बळीराम खटके मैदानात

**घनसावंगी । अजय गाढे**






वंचित बहुजन आघाडीकडून घनसावंगी विधानसभा मतदार संघात राजेश टोपे यांना शह देण्यासाठी कावेरी बळीराम खटके यांना उमेदवारी जाहिर झालीय.कावेरी खटके यांचे पती बळीराम खटके हे वडिगोद्री येथील ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनात सक्रिय अशे सहभागी होते.श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी ओबीसीचे शंबर अशे उमेदवार दिलेत या आधी राष्ट्रवादी,कॉग्रेस,शिवसेना यांनी ओबीसीना वापरून घेण्याचे काम केलं आहे कधीही आमदारकीचे स्वप्न दाखवले नाही ही उमेदवारी दिल्याबद्दल बळीराम खटके यांनी बाळासाहेब आंबेडकर यांचे आभार मानले आहेत तर यावेळी घनसावंगी मतदारसंघात नक्कीच परिवर्तन होईल असा विश्वास बळीराम खटके यांनी बोलताना व्यक्त केलाय तर यावेळी सत्याधार्यांना ओबीसी धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही असा विश्वास बळीराम खटके यांनी बोलताना व्यक्त केलाय मात्र एकीकडे राजेश टोपे,हिकमत उढाण,सतीश गाडगे हे देखील विधानसभा मतदार संघात जोरदार तयारीला लागले आहेत त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असताना वंचित बहुजन आघाडीने घनसावंगीत ओबीसी उमेदवार देऊन एक मोठा झटका दिल्याने आता मात्र कोणाची हवा टाईट होणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

cmyk



राज्य लोकतंत्र शेत-शिवार

शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४ ४



# कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारचा प्लॅन

## महाराष्ट्रातून कांदा एक्सप्रेस दिल्लीला रवाना

मुंबई: सणांच्या पार्श्वभूमीवर कांद्याच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार प्रथमच बफर स्टॉकमधून १६०० टन कांदा महाराष्ट्रातून रेल्वेमार्गे दिल्लीपर्यंत नेणार आहे. कांद्यासाठी रेल्वेचा वापर करण्याचा हा पहिलाच उपक्रम असणार आहे. ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी याबाबतची माहिती दिली आहे. कांदा एक्स्प्रेस ही विशेष ट्रेन महाराष्ट्रातील लासलगाव रेल्वे स्थानकावरुन निघून २० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील किशनगंज रेल्वे स्थानकावर पोहोचणार आहे.

सरकारला आशा आहे की, या पुरवठ्यामुळं दिल्लीमध्ये किमती स्थिर राहण्यास मदत होईल. दिल्लीत बफर स्टॉकमधील कांदा सध्या ३५ रुपये प्रति किलो या अनुदानित दराने विकला जात आहे. विविध शहरांमध्ये कांद्याचे किरकोळ भाव ७५ रुपये किलोवर पोहोचले आहेत. लखनौ, वाराणसी आसाम, नागालँड मणिपूरसह उत्तर-पूर्व राज्यांमध्ये अशीच व्यवस्था केली जाईल.

तोटा कमी करण्यासाठी सीलबंद कंटेनर वाहतुकीसाठी लॉजिस्टिक्स कंपनी कॉनकॉर्डशीही सरकार चर्चा करत आहे. घाऊक भाव कमी



करण्यासाठी सध्याच्या बाजारभावानुसार कांद्याचा लिलाव करण्यात येणार आहे. रेल्वे वाहतुकीमुळं कांद्याचा खर्च कमी होणार असल्याची माहिती ग्राहक व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. नाशिक ते दिल्ली रेल्वेने एका ट्रेनच्या (५६ ट्रकच्या समतुल्य) वाहतुकीसाठी ७०.२० लाख रुपये खर्च येतो, तर रस्त्याने ८४ लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे प्रति ट्रेन १३.८० लाख रुपयांची बचत होते.

सरकार सवलतीच्या दरात कांदा विकणार

५ सप्टेंबरपासून, सरकार मोबाईल व्हॅन, नॅशनल कोऑपरेटिव्ह कंझ्युमर फेडरेशन ऑफ इंडिया आणि नॅशनल ॲग्रिकल्चरल कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया दुकाने, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, मदर डेअरी यासह विविध माध्यमांद्वारे स्टोअरमध्ये साठवलेल्या कांद्यावर अनुदान देण्यास सुरुवात करेल.

किरकोळ किमती कमी करण्यासाठी आपली कारवाई वाढवत दिवाळीपूर्वी मोबाइल व्हॅनची संख्या ६०० वरुन १००० केली जाईल.बफर स्टॉकमधील ४.७ लाख टन कांद्यापैकी ९१,९६० टन कांदा एनसीसीएफ आणि नाफेडला वाटप करण्यात आला आहे. तर ८६,००० टन कांदा गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश आणि मणिपूरसह विविध राज्यांमध्ये पाठवण्यात आला आहे. या उपाययोजनांमुळे आणि महाराष्ट्रातून ताज्या पिकाची अपेक्षित आवक असल्यामुळं सरकार किमती स्थिरावण्याबाबत आशावादी आहे. दुकानातून कांद्याची सरासरी खरेदी किंमत २८ रुपये प्रति किलो आहे.

## उसावरील रसशोषक पायरीला व पांढरी माशी किडींचे व्यवस्थापन



या किडीची पिल्ले व प्रौढ ऊसातील पानाचा रस शोषून घेतात त्यामुळे उसाच्या पानाचा हिरवेपणा कमी होऊन पाने निस्तेज व पिवळी पडतात तसेच हि किड पानावर एक प्रकारचा चिकट व गोड पदार्थ सोडते त्यामुळे पानावर काळ्या बुरशीचा प्रादुर्भाव होऊन काजळी पडल्यासारखा रंग चढून पानांची अन्न तयार करण्याची प्रक्रिया मंदावते आणि उसाची पाने वाळू लागतात व ऊसातील साखरेचे प्रमाण घटते.

पांढरी माशी : या किडीची पिल्ले व प्रौढ दोन्ही पानातील रस शोषण करतात परंतु बाल्यावस्था पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करते या अवस्थेत कीड पानाच्या मागील बाजूने स्थिर राहून पानातील रस शोषण करते त्यामुळे पान निस्तेज होतात,पिवळी व गुलाबी पडतात आणि कालांतराने वाळू लागतात बर्याचदा किड तिच्या शरीरातून करीत असलेल्या चिकट गोड स्त्रावामुळे कॅप्नोडियम बुरशीची पानावर वाढ होऊन पाने काळी पडू लागतात व अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत अडथळा येतो.

व्यवस्थापन : उसाची लागवड पट्टा अथवा रुंद सरी पद्धतीने करावी त्यामुळे कीडनाशकांची फवारणी किंवा धुरळणी करणे सोयीचे होईल. पांढऱ्या माशी ने प्रादुर्भावग्रस्त पाने काढून नष्ट करावीत. उसात पाणी साचत असल्यास चर काढून पाण्याचा निचरा करावा आणि पाण्याचा जास्त ताण पडल्यास पाणी द्यावे. नत्रयुक्त खतांचा जास्त वापर करू नये. पिवळ्या चिकट सापळ्यांचा वापर करावा. पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. व्हर्टिसिलियम लिकॅनी आणि बिव्हेरिया बेसियाना या जैविक बुरशीची ६० ग्रॅम/मी. ली. प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रासायनिक कीटकनाशकामध्ये क्लोरोपायरीफॉस २० टक्के ३० मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के ३ मिली किंवा ॲसीफेट ७५% २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर दुसरी फवारणी करावी. कीटकनाशकाची फवारणी आलटून-पालटून करावी.

# कांद्याच्या पाती पिवळी पडणे आणि कांदा सडणे यावरील उपाय

कांदा लागवड केलेल्या पिकात/ रोपांमध्ये, कांदा सडणे पात पिवळी पडणे, पात सडणे,पातिला पीळ पडणे, माना मोडणे, पात वाकडी होणे, वाढ खुंटने अशा अनेक समस्या येतात. या समस्यांची कारणे व उपाय काय आहेत ते जाणून घेऊयात.

कांद्यावर रोग येण्याच कारण : (१) लागवड करतांना पात कापून लागवड केली जाते, सततच्या पावसाळी वातावरणामुळे, ढगाळ वातावरणामुळे कापलेल्या पातित पावसाचे पाणी गेले की पातीचा तो भाग हळूहळू सडत जाउन शेवटी त्यावर बुरशी येते व रोप मरते. (२) शेतकरी लागवड केलेल्या कांद्याला किंवा रोपाला रासायनिक खते देतात,ते खत मुळीजवळ पडल्यामुळे किंवा २ पातींच्या बेचक्यात पडल्यामुळे पात सडते,रोप मरते. (त्यासाठी कांदा लागवड करण्यापूर्वीच एकरी ४ बॅग सुपरफॉस्फेट व १ बॅग पालाश देऊनच लागवड करावी,कांदा लागवड केल्यावर १५ दिवस कोणतेच रासायनिक खत किंवा युरिया देऊ नये ,त्या ऐवजी ट्रायकोझाईम जी (२) एकरी २० किलो फोकून द्यावे.) (३) शेतकरी कांदा लागवड केल्यावर,किंवा रोपाला युरियाचा अतिरिक्त वापर करतात त्यामुळे रोपांच्या माना लांब होतात, त्यामुळे पातीला पीळ पडतो. (४) कांद्याच्या पातीच्या बेचक्यात मावा किंवा थ्रीप्स सारख्या किडीनि खरडल्यामुळे स्कॉरचिंग होते, पाती वाकड्या झाल्यामुळे वाढ खुंटते.इ. महाराष्ट्रात कांद्याची रोपे





टाकल्या नंतर व लागवडीनंतर सातत्याने आद्रतायुक्त हवामान, पाऊस, धुके,/ धुवारी,/धुईमूळे कांद्यावर रोगांचे प्रमाण वाढले. त्यामुळे शेकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान होत आहे. २/२, ३/३ वेळा बी पेरावे लागले. शेतकऱ्यांना कांद्याचे दोन पैसे मिळू लागताच, केंद्र सरकारने निर्यातबंदीचे हत्यार उपसते. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी मेटाकुटीस आला आहे.


उपाययोजना : १) कांद्याची लागवड करताना रोपांची मुळी किमान २० मिनिटं कार्बेनडीझम सारख्या बुरशी नाशकात बुडवून वावी, रुटबुस्टरची ट्रीटमेंट करावी. २) रोपाला आणि लागवड केलेल्या पिकाला १ महिना युरिया देऊ नये,अन्न द्रव्याच्या कमतरतेमुळे कांद्याची साईडची मुळी वाढ होते पण मधली मुळी न वाढल्यामुळे रोपाला अन्न द्रव्ये ग्रहण करता येत नाहीत, त्यासाठी हायकार्ब, ह्युमिक ॲसिड व चिलेटेड सूक्ष्म अन्न द्रव्यांची ड्रेंचिंग करावी.जी रोपे पिळ पडल्यामुळे खराब झाली आहेत ते उपटून त्याजागी नवीन रोप लाऊन गॅप फिलिंग करावे.हुमनी असल्यास हुमनासुर किंवा भस्मासुर ग्रन्युअल्स एकरी १० किलो खतात मिक्स करून टाकावे. ३)ज्यांची लागवड १ महिन्यांपूर्वी झाली आहे त्यांनी किटक नाशकसोबत मायको सी सी १५ लिटर पंपाला ५/७ मिली वापरून वाढ नियंत्रणात ठेवावी. ४) ज्यांनी ठिबकवर लागवड केली आहे त्यांनी एकरी २५० मिली ह्युमिक ॲसिड आणि ५०० ग्रॅम चिलेटेड मिक्स मायक्रो न्यूट्रिमेंट,५०० मिली सोडावे. या उपायांचा योग्य प्रकारे वापर करून कांद्याची पात पिवळी पडणे आणि सडणे टाळता येऊ शकते.

# पीक संरक्षणासाठी बीजप्रक्रिया महत्त्वाची

पिकांच्या दर्जेदार उत्पादनासाठी वाण निवड, सुयोग्य जमिनीची निवड, सिंचन- खत व्यवस्थापन, पीक संरक्षण आदी बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यासोबतच लागवडीपूर्वी बियाणास शिफारशीत घटकांची बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. लागवडीसाठी हलके, कीड-रोगमुक्त, आकाराने लहान बियाणांची निवड महत्त्वाची ठरते. जमिनीतून तसेच बियाण्याद्वारे पसरणाऱ्या कीड-रोगांपासून संरक्षण होण्यासाठी पेरणीपूर्वी बियाणास जैविक व रासायनिक घटकांची बीजप्रक्रिया महत्त्वाची ठरते. बीजप्रक्रियेमुळे बियाणांभोवती जैविक व रासायनिक बुरशीनाशकांचे सुरक्षित कवच तयार होते. त्यामुळे रोपांचे रोगांपासून संरक्षण होण्यास मदत होते.

बीजप्रक्रियेचे महत्त्व : बहुतांश कीड-रोगांच्या अवस्था या जमिनीमध्ये सुप्तावस्थेत असतात. पोषक वातावरण मिळताच त्यांचा पिकावर प्रादुर्भाव दिसून येतो. पिकांवर येणाऱ्या रोगांना कारणीभूत असलेल्या बऱ्याच सूक्ष्मजीवांचा प्रसार जमिनीतून व बियाणांद्वारे होत असतो. हाच प्रादुर्भाव कमी करून पिकांची सशक्त व जोमदार वाढ होण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक उगवणीच्या तसेच वाढीच्या प्राथमिक अवस्थेत होणारा कीड-रोगांच्या प्रादुर्भाव अटकाव करण्यास मदत मिळते.

घ्यावयाची काळजी : बीजप्रक्रिया करताना शिफारशीत जैविक तसेच रासायनिक घटकांचा शिफारशीत प्रमाणात वापर होईल याची काळजी घ्यावी. कमी किंवा जास्त प्रमाणात वापर झाल्यास त्याचे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. बीजप्रक्रिया केलेले बियाणे लगेच हवाबंद डब्यात किंवा प्लास्टिक पिशवीत भरू नये. बीजप्रक्रिया केल्यानंतर बियाणे थंड व कोरड्या जागी सावलीत किमान २४ ते ४८ तास सुकण्यास ठेवावे. त्यानंतरच पेरणी करावी. बीजप्रक्रिया करणाऱ्या व्यक्तीने



हातामध्ये हातमोजे किंवा प्लास्टिक पिशवीचा वापर करावा. जेणेकरून रासायनिक घटकांचा हातासोबत संपर्क होणार नाही.

डोळ्यांवर चष्मा तसेच नाकाला रुमाल बांधावा अथवा मास्क वापरावा. : बीजप्रक्रिया केलेले आणि पेरणीनंतर शिल्लक राहिलेले बियाणे जनावरांच्या किंवा मानवी खाण्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. विकत घेतलेल्या बियाणांवर बुरशीनाशक आणि कीटकनाशकांची बीजप्रक्रिया केली असल्यास अशा बियाणांवर फक्त जिवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रिया करताना तंबाखू खाणे, पाणी पिणे, सिगारेट ओढणे टाळावे.

बीजप्रक्रिया करण्याच्या पद्धती : बियाणे कापडी पिशवीत ठेवून ही पिशवी गरम पाण्यात ठेवावी. काही वेळानंतर बियाण्याची पिशवी गरम पाण्यातून काढून काही वेळासाठी थंड पाण्यामध्ये ठेवावी. त्यानंतर बियाणे सुकण्यासाठी ठेवून लगेच बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. २५० ग्रॅम जिवाणू संवर्धकाचे पाकीट १० ते १५ किलो बियाण्यास वापरावे. एक लिटर गरम पाण्यात १५० ते २५० ग्रॅम गूळ टाकून द्रावण तयार करावे. द्रावण थंड झाल्यावर त्यामध्ये २५० ग्रॅम जिवाणू संवर्धक मिसळावे. त्यानंतर दहा किलो बियाणे स्वच्छ जागेवर प्लास्टिक किंवा ताडपत्रीवर बियाणांचा पातळ थर पसरून त्यावर तयार केलेले मिश्रण शिंपडावे.

हलक्या हाताने बियाणांस समप्रमाणात लेप बसेल असे हळुवारपणे लावावे. बीजप्रक्रिया करताना बियाणाचा पृष्ठभाग (साल) खराब होणार नाही, याची काळजी घ्यावी. त्यानंतर प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत स्वच्छ कागदावर सुकवावे. बीजप्रक्रिया केलेल्या बियाणांची २४ तासांच्या आत पेरणी करावी. बियाण्यास प्रथम रासायनिक बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्यानंतर दोन ते तीन तासांनी हलके बियाणे वेगळे करावे. त्यानंतर जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा, रायझोबिअम, ॲझोटोबॅक्टर तसेच स्फुरद विरघळविणारे जिवाणू खत यांचे मिश्रण करून लावावे.

बीजप्रक्रियेकरिता ट्रायकोडर्मा वापर : सर्व रब्बी पिकांमध्ये (हरभरा, ज्वारी, गहू, ऊस, मका इत्यादी) ट्रायकोडर्मा (१ टक्के डब्ल्यूपी) ५ ते १० ग्रॅम प्रतिकिलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया केल्यामुळे मर व मूळकूज व खोडकूज, कॉलर रॉट, कोरडी मूळकूज या रोगांपासून पिकाचे संरक्षण होण्यास मदत होते.

विविध पिकांसाठी बीजप्रक्रिया : पीक पिकास जमिनीतून व बियाण्यापासून होणारे रोग बीजप्रक्रिया प्रमाण (प्रति किलो बियाणे) हरभरा मर व मूळकूज व खोडकूज कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यूपी) किंवा थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) किंवा कार्बोक्सिन (३७.५ टक्के) अधिक थायरम (३७.५ टक्के डब्ल्यूपी) किंवा कार्बेन्डाझिम (२५ टक्के) अधिक मॅन्कोझेब (५० टक्के डबल्यू. पी.) ३ ते ५ ग्रॅम. ज्वारी दाण्यावरील बुरशी व करपा थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) किंवा कार्बोक्सिन (३७.५ टक्के) अधिक थायरम(३७.५ टक्के डब्ल्यूपी) ३ ते ५ ग्रॅम. केवडा/गोसावी मेटालॅक्झिल (३१.८ ई.एस) २ मिलि. गहू पानावरील करपा/काजळी किंवा काणी/ तांबेरा थायरम (७५ टक्के डब्ल्यू. एस.) किंवा टेब्यूकोनॅझोल (२ टक्के डी.एस.) ३ ते ५ ग्रॅम.बीजप्रक्रियेचे फायदे : उगवण चांगली होण्यास मदत मिळते. तसेच पिकांची मुळे सशक्त होऊन पिकाची जोमदार वाढ होते. जमिनीद्वारे तसेच बियाणांद्वारे उद्भवणाऱ्या रोगांना अटकाव करता येतो. पेरणीसाठी एकसारखे बियाणे उपलब्ध होते व पेरणी सुलभ होते. रासायनिक खतांची २० ते २५ टक्के बचत होते. जमिनीतून व बियाणांद्वारे पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. बीजप्रक्रियेमुळे बियाणाभोवती जैविक व रासायनिक बुरशीनाशकांचे सुरक्षित कवच तयार होते. त्यामुळे रोपांचे रोगांपासून संरक्षण होण्यास मदत होते. पीक संरक्षणावर होणारा अतिरिक्त खर्च कमी होतो. साठवणुकीदरम्यान बियाण्याचे रोगांपासून संरक्षण होते.




### महत्वाच्या घटना

१२१६ : इंग्लंडचा राजा जॉन मृत्यूमुखी पडल्यामुळे त्याचा ९ वर्षाचा मुलगा हेन्री हा राजेपदी आरुढ झाला.

१७८१ : ब्रिटिश जनरल कॉर्नविलास अमेरिकेला शरण गेले, यामुळे अमेरिकन क्रांती युद्ध संपले.

१८१२ : नेपोलियन बोनापार्टने मॉस्कोच्या सीमेवरुन माघार घेतली.

१८५३ : अमेरिकतील हवाना येथे जगातील पहिली पिठाची गिरणी सुरु करण्यात आली.

१९३३ : जर्मनी लीग ऑफ नेशन्स मधून बाहेर पडले.

१९३५ : इथिओपियावर आक्रमण केल्यामुळे राष्ट्रसंघाने इटलीवर आर्थिक निर्बंध घातले.

१९४४ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजा फिलीपाइन्सला पोचल्या.

१९७० : भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाईदलाकडे सुपुर्द

१९९३ : पुण्याजवळील महारेडिओ दुर्बिण प्रकल्पाचे जनक आणि शास्त्रज्ञ प्रा. गोविंद स्वरुप यांना सर सी. व्ही. रामन पदक जाहीर

१९९४ : रुद्रवीणावादक उस्ताद असद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा 'तानसेन पुरस्कार' जाहीर.

२००० : पार्श्वगायिका आशा भोसले यांना राज्यशासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान

२००५ : मानवतेविरुद्ध गुन्ह्यांसाठी सद्दाम हुसेन यांच्याविरुद्ध खटला सुरू झाला.

२०१९ : सैनिकी शाळेत मुलींनाही प्रवेश मिळण्याच्या प्रस्तावाला स्वरक्षण मंत्री यांची मंजुरी मिळाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०२ : दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण कथालेखक. 'किशोरीचे हृदय', 'विद्या आणि वारुणी' ही कादंबरी, 'तोड ही माळ' हे नाटक व अनेक कथासंग्रह त्यांनी लिहीले. (मृत्यू: ३१ मे १९७३ हैदराबाद, आंध्र प्रदेश)

१९१० : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय- अमेरिकन खगोल वैज्ञानिक. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. (मृत्यू: २१ ऑगस्ट १९९५)

१९२० : पांडुरंगशास्त्री आठवले कृतीशील विचारवंत आणि तत्त्वज्ञ. न्याय, वेदांत व्याकरण आदि शास्त्रांचा अभ्यास केल्यानंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला. अवघ्या वीस सहकार्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'स्वाध्याय परिवार' सुरू केला. त्यांचा जन्मदिन स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २५ आक्टोबर २००३)

१९२५ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (मृत्यू: १७ एप्रिल २००१)

१९२९ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित गांधीवादी विचारधारी भारतीय समाजसेविका निर्मला देशपांडे यांचा जन्मदिन.

१९३६ : शांताराम नांदगावकर गीतकार (मृत्यू: ११ जुलै २००९)

१९५४ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (मृत्यू: १९ सप्टेंबर २००२)

१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता, राजकारणी आणि पंजाब राज्यातील गुरदासपूर येथील विद्यमान संसद सदस्य अजयसिंग देओल उर्फ सनी देओल यांचा जन्मदिन.

१९६१ : अजय सिंग देओल ऊर्फ 'सनी देओल' अभिनेता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१६ : जॉन इंग्लंडचा राजा (जन्म: २४ डिसेंबर ११६६)

१७४५ : आयर्लंड देशातील निबंधकार, कवी, आणि व्यंगचित्रकार जोनाथन स्विफ्ट यांचे निधन.

१९३४ : विश्वनाथ कार ओडिया लेखक, संपादक व समाजसुधारक. १८९६ मधे त्यांनी एक छापखाना काढून 'उत्कल साहित्य' नावाचे सर्वस्वी साहित्याला वाहिलेले दर्जेदार नियतकालिक सुरू केले. (जन्म: २४ डिसेंबर १८६४)

१९३७ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ३० ऑगस्ट १८७१)

१९५० : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८८७)

१९८६ : मोझांबिक देशाचे पहिले राष्ट्रपती समोरा महेल यांचे निधन. (जन्म: २९ सप्टेंबर १९३३)

१९९५ : बाल कलाकार म्हणून पुढे आलेल्या व नंतर सहाय्यक अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या सलमा बेग ऊर्फ 'बेबी नाझ' यांचे निधन. (जन्म:)

२००३ : बोत्सिया व हर्जेगोविना देशाचे पहिले अध्यक्ष अलिजा इझेटबेगोविच यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९२५)

# हमीभावासाठी शेकापच्या खटाऱ्याला मतदान करा





## बेईमानी करणाऱ्यांना धडा शिकवा-भाई ॲड. नारायण गोले

माजलगाव। प्रतिनिधी

शेतकऱ्याची शेतमालाला हमीभाव मिळवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा विधानसभेत पाठवून, माजलगाव मतदार संघात गेल्या पाच वर्षात शेतकऱ्या सह नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यात अपयशी ठरणाऱ्या आणि जनतेशी,जनतेच्या मताशी गद्दारी करणाऱ्यांना माजलगाव विधानसभा निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे विधानसभेचे उमेदवार भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी सरवर पिंपळगाव, सोमठाणा,अडोळा येथे प्रचार दौऱ्यात बोलताना केले.

गतवेळी विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील शेतकरी, कष्टकरी, अल्पसंख्यांक, दलित,मुस्लिम समाजाने पुरोगामी विचाराचे उमेदवार म्हणून ज्यांना मते दिली त्याच लोकांनी जनतेच्या मताशी गद्दारी करत पहाटे शपथविधीला उपस्थिती दर्शवली तसेच अजित पवार यांच्यासह भाजपसोबत घरोबा करून पुरोगामी विचाराशी आणि जनतेच्या मताशी गद्दारी केली याशिवाय पाच वर्षात तालुक्यात माजलगाव मतदार संघात शेतकऱ्यांसह, कामगारांच्या, तरुणांच्या, विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उदासीनता दाखवत शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या भाजपला बळ दिले त्यामुळे जनतेशी गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा याशिवाय जाती-जातीत भांडणे लावणाऱ्या आणि महागाई वाढवुन देशोधडीला लावणाऱ्या व शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव न देणाऱ्या, मराठा समाजा सह धनगर समाजाला आरक्षण नाकारणाऱ्या सरकारला घरचा रस्ता दाखवण्यासाठी शेतकऱ्याच्या कुटुंबातील कार्यकर्ता म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या खटारा चिन्हावर मत देऊन विजयी करण्याचे आवाहन भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राहुल सोळंके, भाई श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, भाई भास्कर कांबळे, यांच्यासह सरवर पिंपळगाव, सोमठाणा, अडोळा शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

## केएसके कृषी महाविद्यालयात जागतिक अन्न दिन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सौ. के. एस. के. काकू अन्न तंत्रज्ञान आणि कृषी महाविद्यालयात जागतिक अन्न दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात कृषी आणि अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अन्न दिनानिमित्त त्यांची मते व्यक्त केली. अन्न दिनाचे महत्त्व, त्याची संकल्पना, त्याचे उद्देश आणि अन्न निर्मिती तसेच प्रक्रिया याबाबत मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील या विशेष दिनानिमित्त त्यांचे मनोगत केले.



यामध्ये प्रा.पी. जी.पोळ, डॉ. वाघमारे , प्रा. मोहसीन शेख, प्रा. तांबोळकर यांनी मनोगत व्यक्त करताना भारत हा कृषीप्रधान देश असून भारतातील सर्व जनतेला अन्न पुरेल तसेच शाश्वत उत्पादन मिळेल याची काळजी घेऊन आधुनिक काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अन्न निर्मितीवर भर द्यावा तसेच मोठमोठ्या कार्यक्रमात होत असलेले अन्न वाटोळे होऊ न देता लागेल तेवढेच अन्न ताटात घेण्याबद्दल माहिती दिली तसेच आहारातील अन्न घटकाचे प्रमाण व त्यांचे मूल्य, फास्ट फुड चे आपल्या शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती दिली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके हे होते. अध्यक्षीय भाषणात साळुंके म्हणाले कि, आधुनिक काळात भारतच नव्हे तर इतर देशातील लोकांना विविध रोगांना सामोरे जावे लागत आहे, याचे प्रमुख कारण म्हणजे मानवी आहार. योग्य संतुलित व सात्विक आहार न घेतल्यामुळेच मानवास विविध प्रकारच्या बाधा होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे आपण सकस आहार घेण्यावर भर द्यावा. तसेच सेंद्रिय उत्पादित अन्नपदार्थच खावे, जेणेकरून मानवाची प्रतिकारक्षमता चांगली होऊन शरीर सुदृढ राहील. भारतीय संस्कृतीत आहार, विहार, आचार आणि विचार या चार गोष्टींना अति महत्व असून या गोष्टी योग्य असतील त संपूर्ण मानव प्रजाती ही सशक्त आणि मजबूत राहू शकेल.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश खिंवसरा आणि श्रुती वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मांजरे यांनी केले. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## सांची बुद्ध विहारात वर्षावास समारोप

माजलगाव। प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहारात आषाढी पौर्णिमा ते अश्वीन पौर्णिमा या वर्षावास कालावधीत डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या पवित्र धम्म ग्रंथाचे वाचन करण्यात आले या ग्रंथ वाचनाचा समारोप अश्विन पौर्णिमा दि १७ऑक्टोंबर वार गुरुवार रोजी करण्यात आला या निमित्त धम्म प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे जिल्हा अध्यक्ष आद बी बी धन्वे सर हे होते त्यांनी कालाम सुत्त मानव मुक्तीचा जाहीर नामा या विषयावर सखोल आसे मार्गदर्शन केले या प्रसंगी सदधम्म सेवा संघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव सर यांनी सुभेच्छा पर आपल मत व्यक्त केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या कार्यक्रमा चे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे शहर अध्यक्ष एल आर मस्के सर यानी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरेआप्पा यांनी मानले तर या वर्षावास कालावधीत तिन महिने ज्यांनी ग्रंथा वाचला ते ग्रंथवाच बौद्धाचार्य डी पी वाघमारे नाना यांनी ग्रंथाचे सेवटचे पान पाचुन प्रतिज्ञा घेऊन ग्रंथवाचनाचा समारोप करण्यात आला या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला सरचिटणीस शोभाताई भोजने,माजी जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा कोषाध्यक्ष अंकुश आण्णा जाधव,जिल्हा सल्लागार धम्मानंद भाऊ साळवे ,क्राती सुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक मगर, बहुजन समाज पार्टी चे अभिमन्यु साळवे,हरिभाऊ साळवे, बाबासाहेब सोळके, भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या महिला अध्यक्षा वंदनाताई घनघाव यांच्या सह धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे,नितीन डोंगरे,मोहन काकडे, बाबासाहेब घनघाव, दयानंद साळवे,प्रणव साळवे, गणपत भालेराव, मंदाताई साळवे,विषाखाताई वाघमारे,मंडोधरी खंदारे,शारदाताई तांगडे,आशाताई मोरे,अनुराधा साळवे,कांताबाई हिरवे,सह भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले



## महर्षि वाल्मिकी जयंती साजरी



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महर्षि वाल्मिकी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते महर्षि वाल्मिकींच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य प्रोफेसर सतिष माउलगे, पदव्युत्तर संचालक प्रोफेसर गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. कर्मचारी कल्याण समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित या जयंती कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कावेरी खुरणे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी महर्षि वाल्मिकींच्या साहित्यिक तसेच तात्कालीन शिक्षणक्षेत्रातील योगदानाबद्दल भाष्य केले. सूत्रसंचालन प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. अशोक नागरगोजे यांनी केले. कार्यक्रमास प्रोफेसर महादेव काळे, डॉ. प्रकाश फड, डॉ. यादव घोडके, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. अशोक नाईक, प्रा. दिनेश शिंदे, डॉ. शकुंतला बडे, प्रा. कुलदीप सानप, डॉ. जालिंदर लोणके, डॉ. कृष्णा नागरे यांच्यासह विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/६६८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १३/०९/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) तौफिक रफिक बागवान रा. अंबड ता अंबड जि. जालना सव्हे नं. ०४, प्लॉट नं. ५५ न.प.मि.नं.१८-६८-५५ चे हस्तांतरकरणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-६८-५५ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- हरिकिसन भवानीदास यांची जागा
पश्चिम : कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण : विठ्ठल घनश्याम गिरी यांचे घर
उत्तर : शेख वाहेद शेख महेमुद यांची जागा

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**


## सोयाबीनची हमीभावाने खरेदी सुरू करा नसता तिव्र आंदोलन-भाई घोलप

पाटोदा। प्रतिनिधी

नवीन सोयाबीनची आवक एक महिन्यापासून बाजारात येत आहे. सोयाबिनचा शासनाचा हमीभाव ४८९२ रुपये आहे आज बाजारात सोयीबीनची खरेदी ३५०० ते ४२०० रुपये असुन यामुळे शेतकरी वर्गाला १ क्विंटलच्या मागे किमान १ हजार रुपयाचे नुकसान सोसावे लागत आहे.शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ ला खरेदी केंद्र चालु करु म्हणून घोषणा केलेली असुन आता शेतकऱ्यांची सोयाबीन नोंदणी चालु केलेली आहे. शासनाने शेतकऱ्याचा विचार न करता सोयाबीन प्लांट (कंपनी) चा विचार केलेला असुन सोया तेल आणि सोया पेंड कंपनीला हजार रुपयाच्या फरकाने सोयाबीन कमी भावात मिळत आहे.



तसेच शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाने खरेदी केल्यानंतर किमान २४ तासाच्या आत पैसे शेतकऱ्यांना मिळावेत, शेतकऱ्यांना सोयाबीन तयार करतांना बियाणे,रासायनिक खते, ट्रॅक्टरचा खर्च,खुरपणी किंवा डुबे चालविणे,फवारणी,काढणी व मळणी याला रोख पैसे द्यावे लागत आहे. त्यासाठी शासनाने सोयाबीनचे हमी भावाने खरेदी केंद्र तात्काळ चालु करुन २४ तासाच्या आत शेतकऱ्यांना पैसे द्यावेत नसता भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकरी तिव्र आंदोलन करतील याची शासनाने गांर्भीयाने नोंद घ्यावी असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदास मा. बजरंग(बप्पा) सोनवणे यांना कळविले आहे.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १८ ऑक्टोबर रोजी सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे उपस्थित होते. याप्रसंगी प्रशिक्षक माजी सैनिक अंकुश सानप, क्रीडा विभागाचे डॉ. सय्यद शानूर, डॉ. कुशाबा साळुंके, डॉ. दिलीप गिऱ्हे, प्रा. दिलीप वाघमारे, बाबासाहेब नाईकनवरे, बाळासाहेब गवळी यांच्यासह शहरातील नामवंत खेळाडू व प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थी उपस्थित होते.महाविद्यालयात सुरु करण्यात आलेल्या या भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेऊन परिसरातील युवक युवतींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी याप्रसंगी केले.

## घोटाळेबाज पुढाऱ्यांना जनतेने थारा देऊ नये - ॲड. नरसिंह जाधव

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातून आतापर्यंत जनतेने निवडून दिलेल्या प्रस्थापित पुढाऱ्यांनी केवळ आपला स्वतः चा आणि आपल्या कार्यकर्त्यांचा विकास केला असून कुणी देवाच्या जमिनी ताब्यात घेऊन घोटाळा केला, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पंचायत मधील शासकिय योजनांना कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून आणायचा आणि आपल्याच कार्यकर्त्यांना गुत्तेदारी देऊन बोगस, थातुर मातुर काम करून पैसे उचलून घेऊन योजनांचा बट्ट्याबोळ करून लोकांच्या पैशांवर डल्ला मारत आपली घरे भरण्याचे काम करीत आहेत. तर कुणी आणखी काही लफडे करण्याचे पाप करून पुन्हा साव म्हणून आम्हीच मतदार संघाचा विकास करूम्हणून जनतेसमोर येत आहेत. अशा घोटाळेबाज पुढाऱ्यांना जनतेने आता थारा देऊ नये असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार गटाच्या विधी सेलचे राज्य उपाध्यक्ष ॲड नरसिंह जाधव यांनी केले आहे.



आष्टी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार गटाच्या विधी सेलचे राज्य उपाध्यक्ष ॲड नरसिंह जाधव हे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून, त्यांनी मतदार संघात संपर्क दौरा सुरु केलेला आहे. तसेच आष्टी येथे संपर्क कार्यालय सुरु केल्यामुळे थेट जनसामान्यांच्या भेटी गाठी वाढल्या आहेत. त्यांच्या उमेदवारीचे गावोगावच्या नागरिकांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात येत आहे. ॲड जाधव यांनी आष्टी तालुक्यांतील कडा, धामणगाव, डोईठान, देवीनिमगाव, कोहिनी, किन्ही, दौला वडगाव, केरुळ, साले वडगाव, धानोरा, कर्डिले वस्ती येथे जाऊन नागरिकांच्या भेटी घेऊन नागरिकांच्या वैयतिक, सामाजिक, राजकिय प्रश्नावर चर्चा करून, गावातील रस्ते, पिण्याचा पाण्याचा प्रश्न, शिक्षण , आरोग्य सेवा आदी समस्याबाबत चर्चा केली. या दौऱ्यात बोलताना ॲड जाधव म्हणाले की, आष्टी मतदारसंघात प्रस्थापित पुढाऱ्याच्या विरोधामध्ये वातावरण असून, या पूर्वी तीन चार वेळा निवडून आलेल्या लोकप्रतिनधींकडून केवळ स्वतःच्याच संस्था वाढवून आपला आणि आपल्या कार्यकर्त्यांचा विकास केला आहे. कोट्यवधी रुपयांच्या विकास निधी येऊनही मतदार संघ भकास आहे. केवळ आपला आणि आपल्या बगलबच्च्याचा विकास करून सर्व सामान्य जनतेला मूलभूत सुविधापासून दूर ठेवन्याचे पाप केले आहे. मतदार संघाच्या विकासासाठी एकही मोठा प्रकल्प आणलेला नाही. आहे ते कारखाने बंद पडला आहे. शासकीय योजनासाठी कोट्यवधीचा निधी मंजूर होऊन येतो मात्र या प्रस्थापित पुढाऱ्यांच्या बगलबच्चे थातूरमातूर कामे करून आलेला निधी आपल्याच घश्यात घालतात आणि या भ्रष्टाचारी कार्यकर्त्यांची पाठराखण हे लोकप्रतिनिधी करतात. याच पैसा आणि सत्तेच्या माध्यमातून मतदार संघात भ्रष्टाचार, गुंडगिरी, आणि दहशतीचे वातावरण निर्माण करून राजकारण केलं जातं. या दहशत आणि भ्रष्टाचाराला जनता वैतागली आहे. आता जनतेने सावध होण्याची गरज असून घोटाळे बाज पुढाऱ्यांना येणाऱ्या निवडणूकीत धडा शिकवून नविन चेहऱ्याला संधी द्यावी असे आवाहन ॲड जाधव यांनी केले.

धामणगाव उपोषणस्थळी भेट

मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सुरू केलेले आमरण उपोषण त्याला पाठिंबा म्हणून धामणगाव ता. आष्टी येथील दोन युवक अशोक पोकळे व साईनाथ पोकळे यांनी गेल्या चार दिवसापासून आमरण उपोषण सुरू केले होते. दि. २५/०९/२४ रोजी ४ वा शासकीय अधिकारी व प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत देऊन युवकांना उपोषण स्थगिती करण्याची विनंती करून उपोषण स्थगिती करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अँड.नरसिंह जाधव, बाळासाहेब निकम, विजयकुमार गाडवे यांच्यासह मराठा बांधव उपस्थित होते.


# वाहनतळाचा प्रश्न कधी सुटणार?

## रस्त्यावरील उभ्या वाहनांमुळे अडचण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शैक्षणिक, राजकीय, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणारे अंबाजोगाईकर वाहनांच्या बाबतीत मात्र कमालीचे बेशिस्त आहेत. मिळेल त्या जागेवर अक्षरशः रस्त्यावरही वाहने उभी असतात फक्त बसस्थानक ,योगेश्वरी देवी मंदीर परिसर वगळता शहरात अन्य कोठेच वाहनतळ (पार्किंग) नाही. या प्रश्नी प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.

अंबाजोगाईत वाहतुकीची डोकेदुखी कायमचीच असते. त्याबाबतीत कोणतेही नेतृत्व कधीच पुढाकार घेऊन तो प्रश्न सोडविण्यासाठी आग्रही दिसत नाहीत. वाहनांना शिस्त लावण्यासाठी कधीकाळी मोठ्या थाटात सुरू झालेली सिग्नल व्यवस्था कधीच कोलमडली. त्याचप्रमाणे वाहनतळाचा प्रश्नही अडगळीस पडला.





अंबाजोगाईतील वाहतुकीविषयी असलेल्या कमालीच्या बेशिस्त पणाचा फटका शालेय,महाविद्यालयीन विद्यार्थी, व सर्वसामान्य नागरिकांना नेहमीच बसतो. अंबाजोगाईत वाहतुकीची संख्या खुप मोठ्या प्रमाणात आहे.शहराच्या सर्व मार्ग, चौकात वाहतुकीची वर्दळ कमालीची वाढली आहे. त्याच पद्धतीने बेशिस्तपणे लागलेली वाहनेही चौका-चौकात अगदी रस्त्यांवर उभी असतात. त्यातच आता सुसज्ज रस्ते झालेत पण वाढतेअतिक्रमण आणि उभी वाहने वाहतुकीच्या समस्येला कारणीभूत ठरतात. प्रशांतनगर, मंडीबाजार तसेच विविध चौकात या वर्दळीच्या ठिकाणी तर वाहनांचा उभ्या हातगाड्यांचा कमालीचा बेशिस्तपणा

दिसतो.प्रशांत नगरात रूग्णालये,शाळा,बँका, अन्य महत्वाची कार्यालय आहेत याही ठिकाणी अस्ताव्यस्तपणे उभी असलेली वाहन आणि अरूंद रस्ता यामुळे कायमची वाहतुकीची कोंडी असते.असेच चित्र मंडीबाजार या ठिकाणी आहे. या परिसरात योगेश्वरी देवीचे मंदिर असल्याने भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. नवरात्र महोत्सवात तर भाविकांना पायी चालणे अवघड होते. ही परिस्थिती लक्षात घेता एकेरी वाहतूकीचा मार्ग आणि वाहनतळ पार्किग या दोन मागण्या अंबाजोगाईकर अनेक वर्षापासून करत आहेत. परंतु प्रशासन व राजकीय अनास्था या बाबत फारसे गांभीर्य घेत नसल्याने हा प्रश्न अनुत्तरीत आहे

# काकडहीरा ग्रामस्थांकडून भगवानगड माऊली मंदीरासाठी ६५ लाख देणगी

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे काकडहिरा गाव आणि भगवान गडाचे खुप जुणे ऋणानुबंध आहेत. या ऋणानुबंधातूनच ग्रामस्थांनी महंत नामेदवशास्त्री यांना गावात बोलावून भगवान गडावरील माऊली मंदीरासाठी ६५ लक्ष रूपयांची देणगी जाहीर केली. यावेळी शास्त्रीजी यांचे ग्रामस्थांच्या वतीने अभुतपुर्व असे स्वागत केले.

विसाव्या शतकातील थोर संत भगवान बाबा आणि पाटोदा तालुक्यातील मौजे काकडहीरा येथील ग्रामस्थ भाविकांचे खुप ऋणानुबंध होते. यामुळे आजही काकडहिरा हे भगवानगडाचे मानाचे गाव आहे. भगवानगडाच्या कीर्तनात चालीचा मान काकडहिरा गावाला आहे. कारण भगवान बाबांनी जेव्हा पंढरपूरची दिंडी सुरू केली तेव्हा दिंडीत सर्वाधिक भाविक काकडहिरा गावचे असायचे. यामुळे भगवान बाबांनी चालीचा मान काकडहिरा गावाला दिलेला आहे. गावातील परंपरेच्या अखंड हरिनाम सप्ताहात भगवान गडाचे महंत शास्त्री महाराज यांना ग्रामस्थाने बोलावून त्यांची भव्य दिव्य रथातून मिरवणूक काढली होती. त्यावेळी आठ जेसीबीच्या माध्यमातून महाराजांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. २०० किलो वजनाचा हारा क्रेनच्या सहाय्याने शास्त्री ◀◀ पान ३ वर



महंत नामदेवशास्त्री यांचे गावात अभुतपुर्व स्वागत

### लहान- थोर अशी सर्वांची मदत

**पाटोदा तालुक्यातील मौजे काकडहिरा गावामध्ये ऊसतोड कामगार, नोकरदार, शेतकरी, शेतमजूर वास्तव्यास आहेत. गावातील प्रत्येक वर्गातील लहान- थोरांनी आपापल्या कुवतीनुसार भगवानगडाच्या माऊली मंदिरासाठी मदत जाहीर केली. माऊलींच्या मंदीरासाठी माझाही एक दगड या भावनेतून सर्वांनी सढळ हाताने देणगी जाहीर करून ६५ लाख रुपये देण्याचे जाहीर केले.**

# द लास्ट ट्रूथ फाउंडेशन कडून दिव्यांगाना संगणकाचे मोफत वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तीना स्वतःच्या, सामाजिक व आर्थिक विकासासाठी सामान्य लोकांप्रमाणे संधी मिळत नाही. विविध शासकीय योजना ज्याला गरज आहे अश्या दिव्यांगा पर्यंत पाहोचत नाहीत, त्यामुळे अनेक दिव्यांगांना स्वयंरोजगार करण्याची इच्छा असते परंतु त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे ते शक्य होत नाही. अपंगत्व हा आपल्या जीवनातील सर्वात मोठा अडसर असल्याचे त्यांना वाटते. त्यामुळे ते नैराश्यात जीवन जगत असतात व मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करतात.

द लास्ट ट्रूथ फाउंडेशन चे संस्थापक ऋषीकेश अशोकराव टाकणखार यांनी माजलगाव तालुक्यातील संगणकाचे ज्ञान असलेले, गरजू व होतकरू तरुण-तरुणींचा शोध घेऊन त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून स्वयंरोजगारासाठी डी इ एफ संस्थेच्या अभिषेक सर यांच्या मदतीने मोफत तीन संगणक व दोन झेरॉक्स मशीन हाफत्यावर मिळून दिल्या.




माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील रामदास कदम, सांडस चिंचोली येथील मीरा गिरी व किट्टी आडगाव येथील ऊसतोड मजूर असलेले रामेश्वर वावळकर यांना तीन संगणक व दोन झेरॉक्स मशीन देऊन तीन ऑनलाइन सर्व्हिसेस सेंटर च्या माध्यमातून ◀◀ पान ३ वर

# आईच्या भुमिकेतून शिक्षक संस्कारक्षम पिढी घडविण्याचे काम करतात - जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील कालिका नगर बीड येथील किड्स प्री - प्रायमरी स्कूल आणि जय कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील महिला भगिनींसाठी दांडीया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी शेकडो महिला भगिनींनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी बीड विधानसभा प्रमुख सौ जयश्री विलास विधाते यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढण्यात आला निवड झालेल्या महीलांना प्रथम अनुक्रमे पैठणी साडी, घड्याळ, डिनर सेट देण्यात आला. याप्रसंगी सौ. विधातेताई यांनी महीला भगीनींना शुभेच्छा देताना आपल्या संस्कृतीत आईला पहीला गुरू संबोधले जाते, पण सध्य परिस्थितीत कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा म्हणून विविध क्षेत्रात नोकऱ्या करतात, छोटे मोठे उद्योग व्यवसाय करतात, परिणामी त्यांना कुटुंबासाठी पाहिजे तेव्हढा वेळ देता येत नाही. तेंव्हा प्राथमिक शिक्षक शालेय अभ्यासक्रमा बरोबरच संस्कार देण्याचे काम करतात तेंव्हा प्राथमिक शिक्षकच खऱ्या अर्थाने आई आणि गुरुची भुमिका पार पाडतात. असे गौरवोद्गार काढले.




यावेळी संस्थेच्या संचालिका वर्षा केंडे यांनी मान्यवरांचा शाल पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला. या कार्यक्रमाला परिसरातील असंख्य महीलांना सहभाग नोंदवला होता.



# वैष्णव जाधव याची विभागीय सायकलिंग स्पर्धेसाठी निवड

**अंबड । प्रतिनिधी**

येथील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेत विजेतेपद पटकावून विभागीय स्तरावर आपली निवड सार्थ ठरवली आहे. यामध्ये १४ वर्षाखालील वैष्णव जाधव याने आपल्या गटात विजय संपादन करून जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत विजेतेपद पटकावले असून त्याची निवड विभागीय स्तरीय सायकलिंग स्पर्धेसाठी झाली असून. या विजयी खेळाडूंचे शाळेचे अध्यक्ष डॉ प्रविणकुमार कासलीवाल,डॉ. रमेशचंद्र गंगवाल, शिरीष सावजी, प्रवीण बाकलीवाल, संजय चांदीवाल, सुरेश दिडपोळे, डॉ. राजेंद्र काला, डॉ. नरेश अग्रवाल, डॉ.संतोष मोहळे, चंद्रप्रभू दिडपोळे, संजय इंचूरे, मुकेश सावजी, संतोष बाकलीवाल, दिपक पाटणी, भूषण काला, डॉ. अनिल पांडे, दिलीप बुर्ले तसेच शाळेचे मुख्याध्यापक एन. एस. भारद्वाज, क्रीडा शिक्षक नागेश वराडे ,क्रीडा शिक्षक हरिश्चंद्र जरांगे,श्रीमती आराधना मुंगीकर यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व पालक आदींनी अभिनंदन केले आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस वीस वर्षे कारावास

**परतुर । प्रतिनिधी**

१८ ऑक्टोंबर रोजी मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना मा. श्रीमती. वर्षा एम. मोहीते यांनी आरोपी प्रकाश माणिकराव वाघमारे, वय ३६ वर्ष रा. जायकवाडी कॅम्प आष्टी ता. परतुर या आरोपीने लैगीक अत्याचार केल्याप्रकरणी कलम ३७६ भा.द. वी. व कलम पोक्सो ३,४ पोक्सो कायदयानुसार वीस वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी १२ हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली.



घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, सदर घटनेतील पिडीता ही ११ वर्षाची अल्पवयीन मुलगी आहे. त्याचा फायदा घेवून दि. ०५/०६/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास पिडीतेचे आई वडील शेतात गेल्यानंतर व पिडीता हि घरी एकटी असतांना आरोपी हा तिच्या घरी आला व पिडीतेला आरोपीने त्याच्या घरी बोलावले व पिडीता त्याच्या घरी गेल्यानंतर आरोपीने अल्पवयीन पिडीतेवर बळजबरीने लैगिंक अत्याचार करून पिडीतेला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांनतर दिनांक ०१/०७/२०२३ रोजी सुध्दा पिडितेला घरी बोलावुन पिडीतेला झुबंबर व बाळया दिल्या त्योवळी सुध्दा आरोपीने पिडीतेवर बळजबरीने लैगिंक अत्याचार केला. त्यांनतर दिनांक ०३/०७/२०२३ रोजी पिडीता नाराज असल्यामुळे पिडीतेच्या आईने विचारपुस केल्यानंतर सदरील घटना पिडीतेने आईला सांगितले. म्हणुन सदर प्रकरणी पिडीतेची आई हिच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन आष्टी येथे गुन्हा कं. १८५/२०२३ कलम ३५४(४), ३७६, ◀◀ पान ३ वर

# केज तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात

**करपा रोग आणि परतीच्या पावसाने कांद्याचे उत्पादन घटणार * शेतकऱ्यांना सरकारच्या मदतीची गरज**

सारणी । दिनकर जाधव

शेतकरी म्हटले की संकटे ही ठरलेलीच असतात. शेतकऱ्यांच्या शेतातील उत्पादनाला कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटे ही शेतकऱ्यांची पाठ सोडत नाहीत. असाच प्रकारे केज तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी नैसर्गिक संकटाने घेरला असून केलेला खर्चही निघतो की नाही ? अशी अवस्था कांदा उत्पादक शेतकऱ्याची झालेली आहे.

यावर्षी पावसाळी कांदा उत्पादन घेण्यासाठी केज तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये कांदा लागवड, पेरणी बहुतांश प्रमाणात केलेली पहावयास मिळत आहे. परंतु पावसाळी कांदे हे उत्पादनासाठी शेतकऱ्यांना अनेक नैसर्गिक संकटांना सामना करावा लागतो. अशीच संकटे यावर्षीही या शेतकऱ्यांच्या कांदा पिकावर आलेली पहावयास मिळत आहेत. कारण कांदा पिकावर परतीच्या पावसामध्ये तर काही कांदा करपा रोगाने घेरला आहे. त्यामुळे हातात आलेले कांदा पिक रोगाने आणि परतीच्या पावसाने नष्ट होऊन चाललेली आहेत त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून काही मदत होईल का नाही ? याची आशा शेतकऱ्यांना लागलेली आहे. सरकार नेहमीच सांगत असते आम्ही शेतकऱ्यांच्या बाजूने आहोत आता वेळ आली आहे शेतकऱ्यांच्या संकटाला दाखवून जाण्याची त्यामुळे सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय घेत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



**सद्या कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडला असून कांदा पिकावर करपा रोगाने खूप मोठ्या प्रमाणात अटॅक केल्यामुळे कांदा पिके संकटात सापडले आहेत त्यामुळे सरकारकडून कांदा पिक उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत होण्याची गरज आहे.**

**-- डि.के.जाधव**
**सारणी (सां) ता.केज**

# मुलींना हवाय शहरातला नवरा

## बोहल्यावर चढू पाहणाऱ्या मुलांनी करायचं काय? मध्यम वर्गीयांची मोठी अडचण


**अंबाजोगाई । नागनाथ वारद**

नोकरी आहे का? पॅकेज किती? शहरात राहणार का? असे एक ना अनेक प्रश्न मुलींकडून विचारले जात असल्याने लग्नाचे वय होऊनसुद्धा मध्यम वर्गीय आणि शेतकऱ्यांच्या मुलाची लग्नगाठ बांधली जात नसल्याने या मुलांवर वयाची ३०-३५ वर्षे ओलांडूनही लग्नाविना राहण्याची वेळ आली आहे. बागायतदारांची घरे लक्ष्मी विनाच ओस पडली आहेत यासाठी शेतकऱ्यांनी मध्यम वर्गियांच्या परिवारानेआता मुलांना कंपनीमध्ये नोकरीस पाठवायला सुरु केलं आहे. वर्षभरातील त्यांच्या पगारांची रक्कम आणि एका पीकात तेवढेच उत्पन्न निघते हे वास्तव आहे. तालुक्यातील ममदापूर, पाटोदा, देवळा, धानोरा अकोला, तडोळा परिसरात बागायती शेती आहे. मुबलक पाण्यामुळे किमती पिके घेतली जातात. त्यातून लाखो रुपयांची कमाई शेतकऱ्यांना होत आहे. त्यातून गावात,शेतात आलिशान बंगले बांधले आहेत. या बंगल्यात सर्व सुखसोयी आहेत. शिवाय आलिशान गाड्या दिमतीला आहेत. शेतकऱ्यांसमोर

वयात आलेल्या आपल्या मुलांच्या लग्नाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावू लागला आहे

गावखेड्यांत वयात आलेली मुले लग्नापासून वंचित आहेत. मुलींना ग्रामीण भागात संसार करण्याची आवड वा इच्छा नाही. ग्रामीण भागातील मुलीसुद्धा ग्रामीण भागात

अशी स्थिती केवळ इथेच नव्हे तर सबंध महाराष्ट्रभर आहे. नोकरीमध्ये मिळणाऱ्या पैशात आणि शहरात राहण्याच्या हौसेखातर ग्रामीण भागातील मुलींना शेतकरी किंवा सामान्य परिवारातील मुलगा पसंत नाही, असं चित्र सर्वत्र ◀◀ पान ३ वर



# माजलगाव येथे नशामुक्ती अभियान शिबिरात २३० रुग्णांची मोफत तपासणी व औषधी उपचार

**ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगावचा सामाजिक उपक्रम**

**माजलगांव । प्रतिनिधी**

येथील ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगाव युनिटने शनिवारी दि.१२ ऑक्टोबर रोजी आयोजित मोफत नशामुक्ती अभियान शिबिरात २३० रुग्णांची तपासणी करण्यात आली यात रुग्णांना मोफत औषधी उपचार करुन सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

माजलगाव येथील जुना बाजार रोड ,जुनी नगरपालिका येथे सकाळी ११ ते दुपारी ४ वा.पर्येत नशामुक्ती अभियान शिबिरात माजलगावकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी शिबिरात २३० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी,मार्गदर्शन व मोफत औषधी उपचार करण्यात आले.शिबिरात बीड शहरातील मनोपचारतज्ज्ञ डॉ.मोमीन मुजाहेद,डॉ.स्वामी व त्यांची टिम उपस्थित होती तसेच,या कार्यक्रमास माजलगाव शहर पोलिस ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे महापालिकेला राष्ट्रीय जल पुरस्कार

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयातर्फे पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि जलसंवर्धनासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांसाठी पुणे महापालिकेला शहरी विभागात तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार २२ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील विज्ञान भवन येथे दिला जाणार असल्याचे अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.




राष्ट्रीय जल पुरस्कारांसाठी शहरी विभागातून पुणे महापालिकेने तत्कालीन आयुक्त विक्रम कुमार यांच्या नावाने प्रस्ताव पाठविला होता. शहरातील ७६ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणी पुरवले जाते. शहरात दररोज चार तास पाणीपुरवठा होतो. दररोज दरडोई १५७ लीटर पाणीपुरवठा होतो. शहरातील ४३ टक्के नळजोडांवर मीटर बसविण्यात आले आहेत. पुणेकरांना १०० टक्के दर्जेदार पाणी पुरवले जाते. तसेच पाणीपुरवठ्याबाबतच्या ८५ टक्के तक्रारींचे निवारण केले जाते. पाणीपट्टीच्या वसुलीचे प्रमाण ६० टक्के असून, महसूल न मिळणार्या पाण्याचे प्रमाण ३० टक्के आहे, असा दावा पालिकेने या पुरस्कारासाठी पाठवलेल्या प्रस्तावात केला आहे.

शहरात १०० टक्के रहिवासी भागात शौचालये असून, त्यांची एकूण संख्या सहा लाख १९ हजार ८२२ आहे. यात ८२२ कम्युनिटी, तर २९२ पब्लिक टॉयलेट्सचा समावेश आहे. तर शहराच्या विविध भागांत १९४ मुतार्या आहेत. शहरातील ९८ टक्के भागांत सांडपाणी वाहिन्यांचे जाळे आहे. शहरात दररोज निर्माण होणार्या ७५ टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. यापैकी ६० टक्के पाण्याचा पुनर्वापर कृषी, सिंचन, बांधकाम, उद्याने, जेटिंग मशिन आदी माध्यमातून केला जातो. तसेच जलसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवले जातात. नैसर्गिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन केले जात आहे. पर्जन्यजल पुनर्भरण, भूजल पुनर्भरण प्रकल्प राबवले जात आहे. प्रकल्प राबविणार्या मिळकतधारकांना मिळकतकरात सवलत दिली जाते. तसेच जलसंवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृतीही केली जाते, असे पालिकेने जलशक्ती मंत्रालयाला पाठवलेल्या प्रस्तावात नमूद आहे.

# ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक पंडित वसंतराव गाडगीळ यांचे निधन

पुणे । प्रतिनिधी

शारदा ज्ञान पीठमचे संस्थापक, ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक पंडित वसंतराव गाडगीळ यांच वृद्धापकाळाने वयाच्या ९४ व्या वर्षी पुण्यात निधन झाले. शुक्रवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर नवी पेठ येथील वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून आणि नातू असा परिवार आहे .



गाडगीळ हे झपाटलेले व्यक्तिमत्व होते टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून संस्कृत विषयात पदवीपर्यंतचे अध्ययन, शारदा ज्ञानपीठाची स्थापना, संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी केलेला प्रयास आणि त्यासाठी अमेरिका, आफ्रिकेमध्ये अनेक वेळा त्यांनी प्रवास केला होता. पं. वसंतराव गाडगीळ यांनी प्रत्येक वर्षी पुण्यात ऋषीपंचमी निमित्त ८० वर्षांवरील तपस्वी, विद्वान, निरनिराळ्या क्षेत्रांत सातत्यानं विधायक कार्य करणाऱ्या पुण्यातील व पुण्याबाहेरील नामवंत व्यक्तींचा सत्कार ते घडवून आणत. ते संस्कृत भाषे विषयी नेहमी आग्रही असतं ते भाषण संस्कृतमध्येच करीत असत. प्रचिन ग्रंथ वेद उपनिषदे यांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. संस्कृत भाषेच्या प्रचार प्रसारासाठी शारदा संस्कृत नावाने ते मासिक चालवत होते.

# कचरा प्रकल्पांच्या दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त
## केशवनगर येथे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

केशवनगर परिसरातील सर्वे नं. ९ ते १३ मध्ये गेल्या चार-पाच वर्षांपूर्वी १०० टन क्षमतेचा सुप्रा आणि ५० टन क्षमतेचा साईराम, असे दोन कचरा प्रक्रिया प्रकल्प करण्यात आले आहेत. मागील काही दिवसांपासून या प्रकल्पांमधून दुर्गंधी येत असल्याने परिसरातील सोसायट्यांमधील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहेत. नागरी वस्तीजवळ असलेले कचरा प्रकल्प येथून तातडीने हटवावेत, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे.



सध्या हे दोन्ही कचरा प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. शहरातील वेगवेगळ्या ठिकाणांहून या ठिकाणी दररोज सुका कचरा आणण्यात येतो. त्यावर दररोज प्रक्रिया केली जाते, असे महापालिकेकडून सांगितले जात आहे. मात्र, सुका कचरा असूनही या प्रकल्पातील कचर्याची दुर्गंधी आजूबाजूला एक-दोन किलोमीटर दूरपर्यंत कशी येते, असा सवाल परिसरातील रहिवाशांनी उपस्थित केला आहे. या भागात नागरी वस्ती वाढू लागली असून, कचर्याच्या दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

# तक्रारीचे निवारण ९० मिनिटांत

बारामती, (प्रतिनिधी)- राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता अंमलबजावणी सुरू झाली असून बारामती विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी शासकीय यंत्रणा सज्ज झाले आहे. सी - विजिल पच्या माध्यमातून नागरिकांना निवडणुकीबाबत तक्रार करता येणार आहे.

पवर दाखल झालेल्या तक्रारीचे निवारण ९० मिनिटांत आम्ही करणार आहोत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा बारामतीचे प्रांताधिकारी वैभव नावडकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. बारामती विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीबाबत आयोजित पत्रकार परिषदेत नावडकर बोलत होते.नावडकर म्हणाले की, मतदारांसाठी वोटर हेल्पलाइन प ही सुविधा असून या पवर मतदाराचा क्रमांक, मतदाराचे नाव व मतदान केंद्राचे नाव याची माहिती मिळणार आहे. उमेदवारांसाठी सर्व परवानग्या सुविधा पोर्टलवर दिल्या जाणार आहेत. जरी ऑफलाइन अर्ज आले तरी आम्ही ते ऑनलाइन करून संबंधित परवानग्या दिल्या जाणार आहेत. दरम्यान, एकाच ठिकाणी सर्व परवानग्या देण्यासाठी एक खिडकी कक्ष कार्यान्वित केला आहे.

एकूण २७२८ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, याबाबतचे मागणी पत्र जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ सुहास दिवसे यांच्याकडे पाठविली असून या कर्मचाऱ्यांसाठी शनिवारी प्रशिक्षण आयोजित केले असल्याचे नावडकर यांनी सांगितले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार गणेश शिंदे उपस्थित होते.

नावडकर म्हणाले की, बारामती मतदारसंघांमध्ये एकूण मतदार संख्या ३ लाख ७५ हजार ७१२ आहे. यात महिलांची संख्या १ लाख ८४ हजार २९० तर पुरुषांची संख्या १ लाख ९० हजार ८४१ तर तृतीयपंथी २१ अशी आहे. मतदारसंघात ३८६ मतदान केंद्र आहेत. यामध्ये सर्वात जास्त मतदार संख्या असलेले जळूची हे मतदान केंद्र असून या ठिकाणी १४,२५० मतदार आहेत. सर्वात कमी मतदार असलेले नेपाळ वळण हे मतदान केंद्र आहे. त्या ठिकाणी फक्त २७१ मतदार आहेत. दिव्यांगांसाठी स्वतंत्र एक मतदान केंद्र करण्यात येणार आहे. या ठिकाणी दिव्यांग कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. एक सखी मतदान केंद्र ठेवणार असून सर्व महिला कर्मचारी या केंद्राचे काम पाहणार आहेत. एक मतदान केंद्र युथ मतदान केंद्र ठेवले जाणार असून तरुण अधिकारीच हे मतदान केंद्र चालवतील.

# पोलिस उपायुक्त नवटक्के यांचा पाय खोलात ; पतसंस्थेतील गैरव्यवहाराचा तपास सीबीआयकडे

पुणे । प्रतिनिधी

जळगावमधील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) पतसंस्थेतील गैरव्यवहार प्रकरणात पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील तत्कालीन पोलिस उपायुक्त भाग्यश्री नवटक्के यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे. संशयित आरोपी सुनील झंवर तसेच कुणाल शहा यांनी पोलिस महासंचालकांकडे दिलेल्या तक्रार अर्जावरून ही कार्यवाही करण्यात आली आहे.



याप्रकरणी पोलिस उपायुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे यांनी सरकारच्या वतीने तक्रार दाखल केली होती. त्याप्रमाणे तत्कालीन उपायुक्त भाग्यश्री नवटक्के यांच्यासह आणखी काही जणांविरुद्ध फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार करणे अशा कलमाअंतर्गत हा गुन्हा दाखल केला गेला होता. एका अतिवरिष्ठ अधिकार्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बीएचआर पतसंस्थेविरुद्ध राज्यातील वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुण्यातील डेक्कन पोलिस ठाणे, पुणे ग्रामीण पोलिस दलातील शिक्रापूर आणि पिंपरी चिंचवडमधील आळंदी पोलिस ठाण्यातही गुन्हे दाखल करण्यात आले होते.

पोलिसांच्या पथकाने जळगावात दहा ठिकाणी छापे टाकले होते. दरम्यान छाप्याच्या वेळी गैरप्रकार झाल्याचा आरोप झंवर याने केला होता. पोलिस अधिकारी आणि कर्मचार्यांचे जेवणाचे बिल दुसर्या एका व्यक्तीने दिले होते. छाप्यासाठी खासगी गाड्यांचा वापर करण्यात आला होता, असा आरोप झंवरने गृहविभागाकडे दिलेल्या तक्रार अर्जात केला होता. राजकीय वैमनस्यातून मला गोवण्यात आले, असे तक्रार अर्जात त्याने म्हटले होते. झंवर माजी मंत्री भाजपचे नेते गिरीश महाजन यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी त्या वेळी केला होता. त्यानंतर महाजन आणि खडसे यांनी एकमेकांवर आरोप केले होते.

# कारेगाव ग्रामपंचायतच्या सरपंचपदी वृषाली गवारे यांची बिनविरोध निवड

रांजणगाव गणपती - कारेगाव (ता. शिरूर) ग्रामपंचायतच्या सरपंच पदी वृषाली प्रशांत गवारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी संजीव पुंडलीक साळवे यांनी ही माहिती दिली.



मावळत्या सरपंच निर्मला शुभम नवले यांनी राजीनामा दिल्याने सरपंच पदाच्या निवडणुकीत गवारे यांचा एकमेव अर्ज आल्याने वृषाली गवारे यांची सरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

कारेगावच्या रिक्त झालेल्या सरपंच पदावर निर्मला नवले यांनी राजीनामा दिल्यानंतर उपसरपंच असलेल्या तुषार नवले यांची प्रभारी सरपंच म्हणून निवड करण्यात आली होती. मात्र अगदी दोन दिवस पदभार स्वीकारल्यानंतर सरपंच पदाची निवडणूक लावण्याची ग्रामपंचायत सदस्य आणि अधिकारी यांनी तयारी केली. त्याच अनुषंगाने (दि. १८) रोजी वृषाली प्रशांत गवारे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी संजीव पुंडलीक साळवे यांनी केली. यावेळी उपसरपंच तुषार नवले, माजी सरपंच निर्मला शुभम नवले, संदीप नवले, अजित कोहोकडे, सोनाली नवले, शहाजी तळेकर, तेजस फलके, नागेश शेलार, जयश्री कोहोकडे, हौसाबाई जगताप, शुभम नवले, संदीप गवारे, ग्रामविकास अधिकारी किसन बिबे, तलाठी रवींद्र जाधव, उपस्थित होते.

# देशाला विकसित करण्यासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही

पुणे - 'तिसरी महासत्ता होण्यासाठी देश विकसित होणे गरजेचे आहे आणि देशाला विकसित करण्यासाठी व्यक्ती व समाजाच्या विकासाला सहकाराशिवाय पर्याय नाही,' असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री सीए सुरेश प्रभू यांनी केले.

कॉसमॉस बँकेच्या मुख्य कार्यालयात गुरुवारी (ता. १७) आयोजित कार्यक्रमात 'नवीन राष्ट्रीय सहकार धोरण निश्चितीचे पैलू' या विषयावर प्रभू बोलत होते. ते म्हणाले, 'देश विकसित करण्यासाठी देशाची संपूर्ण क्षमता आपण वापरली पाहिजे.

व्यक्ती आणि समाजाचा विकास होणे आवश्यक असून, हे सहकारामुळेच साध्य होऊ शकेल. कायमस्वरूपी वाढत राहील अशी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी शेतकरी, कामगार, महिला, युवक, नवउद्योजक यांना बळ मिळाले



पाहिजे. नवीन राष्ट्रीय सहकार धोरण तयार करताना या बाबींचा बारकाईने विचार केला आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रभावी उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.' कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे म्हणाले की, 'सहकार क्षेत्रापुढील आव्हाने वाढली आहेत. उत्तम उत्पादने व उत्तम सेवा देण्यासाठी तंत्रज्ञान व आर्थिक पाठबळ यांची गरज आहे. याबाबत केंद्र व राज्य सरकार योग्य धोरण आखत असल्यामुळे सहकार क्षेत्र मजबूत होणार आहे.' महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशनचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर म्हणाले, 'सहकार धोरण यशस्वी होण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन एकाच हेतूने काम करणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार खाते निर्माण केल्यामुळे सहकाराला बळ आले आहे. सहकाराला सामान्य माणसाची समृद्धी अपेक्षित आहे.'

प्रारंभी ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूटच्या (व्हॅम्निकॉमच्या) संचालिका डॉ. हेमा यादव, अंब्रेला ऑर्गनायझेशनचे प्रभात चतुर्वेदी यांनी मनोगत व्यक्त केले.

## जुन्नर वनविभागाकडे ४ बिबट बेस कॅम्प

पुणे । प्रतिनिधी

जुन्नर वनविभागाकडे ४ बिबट बेस कॅम्प,२५० पिंजरे, २३५ कॅमेरा ट्रॅप, ३ थर्मन ड्रोन, ४ रेस्क्यू व्हॅन उपलब्ध आहे. जुन्नर वनविभागात बिबट हल्ल्यात झालेले मृत्यू दुर्दैवी आहेत. वनविभागाने दिलेल्या सूचनांचे पालन केल्यास लोकजीवन सुरक्षित होण्यास मदत होईल, असे जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी म्हटले आहे. जुन्नर वनविभागांतर्गत पुणे जिल्ह्यातील उत्तरेकडील जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर चार तालुक्यांचा समावेश होतो. वनविभागाची ६११.२२ चौ.कि.मी वनजमीन असली तरी व्यवस्थापनाच्या दृष्टीने जुन्नर, ओतूर, मंचर, घोडेगाव, खेड, चाकण, शिरूर सात वनपरिक्षेत्रामध्ये विभागली गेली आहे. जुन्नर वनविभागांतर्गत मागील १० वर्षांत बिबट्याच्या झालेल्या हल्ल्याचा विचार केला असता, शेत पिकांच्या कामाकरिता गेलेल्या शेतकरी, मजूर, शेत परिसरातील एकट्या घराभोवतालच्या परिसरातील कुंपण नसलेल्या ठिकाणी झाले आहेत.

# भोर विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन अलर्ट




भोर । प्रतिनिधी

भोर विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून भोर विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसंदर्भात आचारसंहिता मतदान केंद्र, मतदान कार्यपद्धती साठी प्रशासनाकडुन तयार करण्यात आलेल्या तयारीची माहिती भोर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी दिली.

भोर तहसिल कार्यालय निवडणूक यंत्रणेबाबत माहिती देण्यात आली. यावेळी अधिकारी उपविभागीय अधिकारी डॉ. खरात उपजिल्हाधिकारी पूनम अहिरे, तहसीलदार निवास ढाने, नायब तहसीलदार अजिनाथ गाजरे उपस्थित होते. डॉ. खरात म्हणाले की, भोर, वेल्हे, मुळशी तालुक्यात ४७७ गावे असून तालुक्यात २४०, वेल्हे ९६ तर मुळशीत ३१८ असे एकूण ५६४ मतदान केंद्र आहेत. भोर तालुक्यात बुरुडमाळ येथे सर्वात कमी मतदार २० महिला आणी २० पुरुष, असे ४० मतदार आहेत. भोर तालुक्यात रायरेश्वर हे सर्वात उंचीवर आसलेले मतदान केंद्र असून १६० मतदार आहेत. तीनही तालुक्यात एकूण ४ लाख २१ हजार ५५३ मतदार आहेत. एकाच टप्यात निवडणूक होणार असून २२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर सुटटी दिवस वगळुन अर्ज स्वीकारले जाणार आहे. दि. २३ नोव्हेंबर मतमोजणी कान्होजी जेधे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोर येथे होणार आहे. पुरुष मतदार २ लाख २३ हजार ३५६ तर महिला मतदार १ लाख ९८ हजार १९१, तृतीयपंथी ६, असे एकूण ४ लाख २१ हजार ५५३ मतदार आहेत.

१५०० पेक्षा अधिक मतदान असणारे एकही केंद्र नसून शहरी मतदान केंद्र ५४ तर ग्रामीण ५०० मतदान केंद्र आहेत सर्वात लहान बुरुडमाळ ४० मतदान केंद्र आहे. निवडणुकीसाठी सुमारे ३ हजार कर्मचारी लागणार या शिवाय राखीव ५०० कर्मचारी ३५०० कर्मचारी ७० झोनल ऑफिसर आहेत. प्रशिक्षण नवसहयाद्री घेणार आहे.इव्हीएम आयटीआयला घेणार स्टाँगरुम आयटीआयला साहित्य वाटप पानशेत, वेल्हे, भोर, मुळशी आहेत. महिला मतदान कर्मचारी ज्या त्या मतदार संघातच काम करणार आहेत. आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. चोवीस तास ९ एसएसटी ९ हँडा स्कॉड राहतील तीन तालुक्यात गटविकास अधिकारी आचार संहिता प्रमुख नेमले आहेत. एक खिडकी योजनेतून अर्ज घेऊन परवानगी दिली जाणार आहे.

# माती व पाणी अन्नाचे शत्रु ठरत आहेत
## विकास दांगट यांचे मतः 'एमआयटी एडीटी'त जागतिक अन्न दिन साजरा

पुणेः शेतीप्रधान भारतातील शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती आता मागे सोडली आहे. हरित क्रांतीनंतर देशातील अन्नधान्य उत्पादनात प्रचंड वाढ झाली असली तरी शेतकऱ्यांकडून किटकनाशके व रसायनांच्या वाढलेल्या वापरामुळे मातीची सुपिकता खालावली आहे. मानवी हस्तक्षेपामुळे भूजलातील पाणी देखील प्रदुषित होत आहे. ज्याचा परिणाम रोजच्या खान्यातील अन्नाच्या दर्जावर होतो. ज्यामुळे, सध्या माती व पाणी हे अन्नाचा दर्जा खालाविण्यासाठी मुळ शत्रु ठरत आहेत, असे मत एसव्ही ग्रुपचे चेअरमन व उद्योजक विकास दांगट यांनी मांडले.

ते येथे एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या स्कुल ऑफ फुड टेक्नॉलॉजीतर्फे जागतिक अन्न दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.



या प्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनिता कराड, इन विरो केअर लॅबचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.निलेश अमृतकर, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, प्रभारी प्राचार्य डॉ.अंजली भोईटे, डॉ.संगिता फुंडे, डॉ.सुजाता घोडके, डॉ.अशोक तोडमल, डॉ.रिंकू अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ.अमृतकर म्हणाले, पंतप्रधान मोदींनी म्हटल्याप्रमाणे जगातील कुठल्याही डायनिंग टेबलवर एकतरी भारतीय पदार्थ असावा; अशा मोठ्या अन्नक्रांतीसाठी आपण पुढाकार घ्यायला हवा. त्यासाठी अन्नाच्या विविध प्रकारांवर नवनविन संशोधन होणे, त्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे अतिशय आवश्यक असल्याचे मतही त्यांनी यावेळी मांडले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना, प्रा.डॉ.सुनिता कराड म्हणाल्या, भारत हा मुख्यतः शेतीप्रधान देश; परंतू, शेतीला जोडधंद्याची जोड देणे आता काळाची गरज आहे. यासह, शेती तसेच अन्नधान्याचा दर्जा वाढविणारी उत्पादने तसेच बी-बियाण्यांच्या संशोधनासाठी शास्त्रज्ञांना प्रोत्साहन द्यायला हवे. भविष्याचा विचार करून एकवेळ उत्पन्न थोडे कमी झाले तरी चालेले मात्र, शेतकऱ्यांना जैविक शेती करण्यासाठी प्रोत्साहित करायला हवे, असेही त्या पुढे म्हणाल्या.

एमआयटी एडीटी विद्यापीठात यंदाचा जागतिक अन्न दिन विद्यार्थ्यांतर्फे विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. ज्यामध्ये, फुड स्टॉल, संशोधन स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन यादी गोष्टींचा समावेश होता. विश्वशांती प्रार्थनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ.भोईटे यांनी तर आभार डॉ. सुजाता घोडके यांनी मानले.

### विविध मान्यवरांचा पुरस्काराने सन्मान

जागतिक अन्न दिवसाच्या निमित्ताने अन्न आणि शेती क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्वांचा एम.एस.स्वामीनाथन चेअरच्या माध्यमातून पुरस्कार देवून एमआयटी एडीटी विद्यापीठातर्फे गौरव करण्यात आला. यात गोव्यातील प्रगतशील शेतकरी चिन्मय तानशिकर, सातारा मेगा फुड पार्कचे उपाध्यक्ष विजय कुमार चोले, वरुण अग्रो प्रोसेसिंग फुड्स नाशिकच्या व्यवस्थापकीय संचालक मनिषा धात्रक यांचा समावेश होता. याप्रसंगी, तिन्हीही पुरस्कार विजेत्यांनी मनोगते व्यक्त करताना आपल्या आयुष्यातील अनुभवांनी विद्यार्थ्यांना वैचारिकदृष्ट्या समृद्ध केले.